मंगळवार, १६ जानेवारी २०२४
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १५१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 16 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-151 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05




## ...अन् ती बिबट्याची बछडी पुन्हा मायेच्या कुशीत !

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** उसाच्या फडात आढळलेली बिबट्याची बछडी वन कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे सोमवारी पहाटे पुन्हा मातेच्या कुशीत विसावली. बहे-नेर्ले हद्दीतील लक्ष्मी मंदिर परिसरात गडाळे यांच्या शेतात रविवारी दुपारी बिबट्याची दोन बछडी आढळली होती. याबाबत तत्काळ आधार ॲनिमल रिस्पेक्ट समूहाचे प्रा. विजय लोहार यांच्यासह वन विभागाला माहिती देण्यात आली. वन विभागाच्या उपवन संरक्षक डॉ. नीता कट्टे, सहायक वन संरक्षक डॉ. अजित साजणे, मानद वन्य जीवरक्षक अजित पाटील आणि वनक्षेत्रपाल एकनाथ पारधी आदींच्या नेतृत्वाखाली मोहिम राबविण्यात आली. घटनास्थळी उसतोड सुरू असताना बिबट्याची बछडी आढळली होती. त्या ठिकाणी उसतोड थांबविण्यात आली. पिलांना संरक्षित करून त्या ठिकाणी बछड्यांना घेण्यासाठी मादी बिबट येणार हे गृहित धरून दृष्य छायांकित करण्यासाठी कॅमेरे लावण्यात आले. सोमवारी पहाटे तीन वाजणेच्या सुमारास मादी बिबट्याने घटनास्थळी येऊन दोन्ही पिलांना घेऊन जात असल्याचे दृश्य कॅमेऱ्यात कैद झाले आहे.

# ठाकरे गटाची धाव सुप्रीम कोर्टात

## विधानसभा अध्यक्षांमुळे कोर्टाचा अवमान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ठाकरे आणि शिंदे अशा दोन्ही गटातील आमदारांना पात्र ठरवले, परंतु खरी शिवसेना म्हणून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील पक्षाला मान्यता दिली. या निर्णयाविरोधात ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहे. उद्धव ठाकरे यांनी नार्वेकरांच्या निकालाविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे. विधानसभा अध्यक्षांच्या निकालामुळे सुप्रीम कोर्टाचा अवमान झाल्याचे ठाकरे गटाने ऑनलाईन दाखल केलेल्या याचिकेत म्हटले आहे.**

सर्वोच्च न्यायालयाने मे २०२३ मध्ये शिवसेना आमदार अपात्रता प्रकरण विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे सोपवले होते. मर्यादित कालावधीत याबाबत निकाल देण्याचे आदेशही दिले होते. मात्र ही सुनवाणी अखंडित होऊ शकली नाही.

सुनावणी वेगवान व्हावी आणि लवकर निकाल लागावा, यासाठी ठाकरे गटाने त्यावेळी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर कोर्टाने विधानसभा अध्यक्षांना मर्यादित काळात निकाल देण्याचे आदेश दिले. दोन्ही गटांचे युक्तिवाद ऐकून ३१ डिसेंबरपर्यंत निकाल लागणे अपेक्षित होते. परंतु, राहुल नार्वेकरांनी पुन्हा वेळ वाढवून मागितला आणि अखेर दहा जानेवारीला निकालाचे वाचन केले.

राहुल नार्वेकरांनी २०१९ मधील शिवसेनेची घटनादुरुस्ती अवैध ठरवत उद्धव ठाकरेंचे पक्षप्रमुख पदच अमान्य केले.



तसेच, १९९९ ची पक्षघटना आणि बहुमताच्या आधारे शिंदे गटच खरी शिवसेना असल्याचा निकाल दिला. शिंदे गटातील १६ आमदार पात्र ठरवलेच, परंतु ठाकरे गटाच्याही १४ आमदारांना पात्र करण्यात आले, हा आश्चर्याचा धक्का मानला गेला.


आम्ही शोधतोय ऑनलाइन जगातला

आधुनिक केसरी

महाराष्ट्राचा महाकवी

राज्यस्तरीय यू-ट्यूब काव्यवाचन स्पर्धा

स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांचे अभिनंदन

01 फेब्रुवारी 2024

रोजी कळणार पहिल्या फेरीचा निकाल
त्याचवेळी पुढील फेरीबाबत सविस्तर माहिती देण्यात येईल.

31 जानेवारीपर्यंत सर्व स्पर्धकांना त्यांच्या कवितांचे व्ह्युज, लाईक आणि वॉच टाईम वाढवण्यासाठी कालावधी देण्यात येत आहे.


# रस्ते अपघात रोखण्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा

## खासदार डॉ. सुभाष भामरे : धुळ्यात 34 व्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज


धुळे: वाढते अपघात रोखण्यासाठी सरकारी यंत्रणेसमवेत नागरिकांचा सहभाग आवश्यक आणि महत्वाचा आहे, असे प्रतिपादन जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष तथा खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील नियोजन भवनात आज 34 व्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाचे उदघाटन झाले. त्यावेळी खासदार डॉ. भामरे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा न्यायाधीश संदीप स्वामी, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता विवेक नवले, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक ए. आर. यादव, प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल कदम, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी चारुदत्त व्यवहारे, सहायक पोलीस निरीक्षक (वाहतूक) भूषण कोते आदी उपस्थित होते. खासदार डॉ. भामरे म्हणाले की, देशात दरवर्षी एक ते दीड लाख नागरिक रस्ते अपघात मृत्यूमुखी पडतात. त्यांच्यापेक्षाही दुप्पट नागरिक हे अपंग होतात. यात तरुणांचे प्रमाण 50 टक्क्यांपेक्षा अधिक आहे. हे चित्र चिंताजनक आहे. रस्ते अपघात रोखण्यासाठी मोटार कंपन्या निर्माते, रस्ते निर्माण करणारे अभियंते, वाहतूक खाते, पोलीस, सार्वजनिक बांधकाम, सरकारी यंत्रणा, बिगर सरकारी संस्था, प्रवासी, नागरिक या सर्वांनी रस्ता सुरक्षा सप्ताहात सहभाग घेऊन रस्ता अपघातातील मृत्यू रोखण्यासाठी आवश्यक पावले उचलणे आवश्यक आहे. मानवी चुकांमुळे 85 टक्के अपघात होतात. त्याचा अभ्यास करुन पोलीस विभाग, परिवहन विभाग तसेच सरकारच्या माध्यमातून विविध प्रयत्न केले जात आहेत. परंतु, यात सर्वांत मोठी जबाबदारी ही वाहन चालविणारे, वाहनात बसणारे आणि रस्ते नियमांच्या पालनासाठी नागरिकांचे सहकार्य महत्वाचे आहे.



पोलीस अधीक्षक धिवरे म्हणाले की, धुळे जिल्ह्यात 2023 मध्ये 350 च्या पेक्षा अधिक रस्ते अपघात झाले. हे अपघात अतिशय लहान– लहान कारणाने होतात. अपघातांचा मूळ कारणाचा शोध घेवून पोलीस, उपप्रादेशिक परिवहन विभाग, बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग तसेच सर्वसामान्य जनता या सर्वांनी मिळून जिल्ह्यात अपघाताचे प्रमाण कसे रोखता येईल यादृष्टीने काम करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी नवले, यादव यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी, मान्यवराच्या हस्ते रस्ता सुरक्षा अभियानाच्या माहिती पुस्तिकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच महिलांना हेल्मेटचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक कदम यांनी, तर आभार कोते यांनी मानले.

जिल्हाधिकारी गोयल म्हणाले की, रस्ता सुरक्षा ही महत्वाची आहे. यात सर्वांचा सहभाग महत्वाचा आहे. रस्ता सुरक्षेसंदर्भात जिल्हा, राज्यस्तरावर तसेच सर्वोच्च न्यायालयात समिती गठित करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हास्तरावर नियमित बैठका आयोजित केल्या जातात. त्यात कुठे ब्लॅक स्पॉट, अपघात प्रवण ठिकाणांचा आढावा घेऊन नागरिकांना आवश्यक सुविधा व उपाययोजना केल्या जातात. नागरिकांनी अपघात रोखण्यासाठी खबरदारी घेतली पाहिजे. जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी प्रत्येकाने स्वंयप्रेरणेने रस्ता सुरक्षा विषयक नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. यावर्षी 15 जानेवारी ते 14 फेब्रुवारी 2024 या कालावधीत रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत असून रस्ता सुरक्षा बॅनर्स, माहितीपत्रक, गतीरोधक चिन्हे, रिफलेक्टिव्ह टेप बसविणे, हेल्मेट वापराबाबत जनजागृती, नेत्रतपासणी शिबिर, अपघात प्रवण क्षेत्राची तपासणी, शालेय विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती, रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## त्या फुलांच्या गंधकोषी

आधुनिक केसरी

प्रत्येकाची नजाकत वेगळी. फुलांचा राजा गुलाब. त्याचा दिमाख काही वेगळाच. पण तुम्हाला सांगू...? ही सगळी फुले तर मन मोहून टाकणारी आहेतच पण साधे रानफुल किंवा गवतफुल सुद्धा आपले मन आकर्षून घेते. म्हणून तर एका कवितेत म्हटले आहे- गवतफुला रे गवतफुला, असा कसा रे सांग मला तू, सांग तुझा लागला लळा. फुलांशिवाय आपल्या जीवनाची आपण कल्पना करू शकत नाही. आपल्याकडे आलेल्या पाहुण्यांचे स्वागत आपण पुष्पगुच्छ देऊन करतो. परमेश्वराची पूजा आपण फुलांनीच बांधतो. कोणाबद्दलही आदर, प्रेम व्यक्त करण्यासाठी फुलांसारखे दुसरे साधन नाही. आपण उपमा सुद्धा फुलांच्याच देतो. परमेश्वराबद्दल सांगताना त्याचे हात, पाय , चेहरा असे न म्हणता आपण चरणकमल, करकमल, मुखकमल असे शब्द वापरतो. व्याख्यान मालेतील भाषणांचा उल्लेख प्रथम पुष्प, द्वितीय पुष्प असा करतो. अशा रीतीने फुले आपली भौतिक आणि भावनिक जीवन व्यापून राहिली आहेत. फुले असतात अल्पजीवी. सकाळी उमलतात आणि संध्याकाळी कोमेजतात. आपले जीवन अल्प आहे हे त्यांना माहित नसते का ? पण ती उमलायची थोडीच थांबतात...! आपल्या पूर्ण शक्तीनिशी ती फुलतात. गुलाब तर काट्यांवर फुलतो. पण आपल्याजवळ जे काही आहे त्या निशी ते पूर्ण उमलतात. प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा कसे जगायचे हे शिकायचे असेल तर फुलांकडून शिकावे असे मला वाटते. प्रख्यात इंग्रजी कवी टेनिसन एकदा म्हणाला होता, ' एक फुल जाणणे, म्हणजे अवघे विश्व जाणणे.' तो याच अर्थाने तर म्हणाला नसेल ? म्हणूनच आपण किती जगतो यापेक्षा कसे जगतो हे जास्त महत्वाचे आहे. संत ज्ञानेश्वर, स्वामी विवेकानंद यांच्यासारख्या काही महान विभूती अगदी अल्प आयुष्य जगल्या. पण त्यांनी आपल्या अल्प आयुष्यात मानव जातीसाठी जे काही कार्य केले त्याचा सुगंध आजही दरवळतो आहे.





## आनंदी पहाट

### सुरक्षा स्वतःची व घरातील मौल्यवान वस्तूंची

आधुनिक केसरी

मनात घर करून राहिलेल्या घराला आपल्या मनाइतकंच सुंदर सजवायचं, खुलवायचं असतं. घर छोटं असलं तरी चालतं पण त्याला सजवणारं मन मात्र मोठं असावं लागतं. आपल्या छोट्या घरातच मोठ्या मनानं सौंदर्याचा साक्षात्कार घडवायचा असतो. तेव्हाच आपल्या मनातलं घर हवं तसं तयार होऊ शकतं आणि घरातल्या मनाला त्याचा आनंद मिळू शकतो. दैनंदिन जीवनात निरनिराळे प्रसंग, अनुभव येत असतात की ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगानं गृह सजावट करण्याची जरुरी असते. अर्थात सरधोपटपणे केलेल्या कामात इतका विचार केलेला नसतो. पण आपल्या मनातल्या घराच्या सुंदरतेसाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणं आवश्यक असतं. घर केवळ चार भिंतीचं नसतं, घराचं घरपण आपण मिळवायचं असतं, त्या घरात मनाला रमवायचं असतं. आपल्याच घरात रोज नवं काहीतरी आजमावायचं असतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

मनाला रमवण्यासाठी आणि नवं आजमावण्यासाठी गृहसजावटीत मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. जे घर आपल्या मनांत घर करून राहतं त्या घराची आणि आपली सुरक्षा ही निश्चितच अधिक महत्वाची असते. त्यासाठी केवळ आधुनिक उपकरणे वापरून पुरेसं होत नाही, तर त्यासोबत सुरक्षा रक्षकही तैनात करावे लागतात. केवळ आपण घरात नसतानाच नाही तर, असताना देखील सुरक्षा रक्षकाची जरुरी असते. आपण आपल्याच कामात व्यग्र असतो, त्यामुळे अनेकदा आपला घरातील वावर बेसावधपणे होत असतो. आपली आणि आपल्या मालमत्तेची काळजी घेणारी सुरक्षा व्यवस्था त्यामुळेच जरुरीची असते. अन्यथा आपल्याच घरांत आपण असुरक्षित राहण्याची शक्यता हल्लीच्या दिवसांमध्ये असू शकते. अलीकडच्या काही काळांपासून सातत्यानं कोठे-ना-कोठेतरी घरफोडी, लुटमार, प्राणघातक हल्ले होत असल्याचं आपल्याला ऐकायला मिळतं. त्यामुळे आपली आणि आपल्या मालमत्तेची सुरक्षा व्यवस्था योग्य प्रकारे करणे आवश्यक आहे.



आधुनिक केसरी

### ज्ञाने उपरती | खलनाश ||

कर्तव्याची पुजा | कर्माचे पुजन ||
आत्मा निरंजन | संतवृत्ती ||१||
चित्तात चिंतन | मौनात गुंजन ||
हरिचे भजन | रात्रंदिन ||२||
भक्तीचा उमाळा | भावाचे कोंदण ||
देवाशी भांडण | लडीवाळ ||३||
मायेचा गुलाम | विकारांचा दास ||
अहंकारी फास | खलवृत्ती ||४||
सत्कर्माची जाण | सज्जन संगती ||
ज्ञाने उपरती | खलनाश ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

गांठोडें सोडून पाहाती ।हातां पडिलें तेंचि खाती ।
कांहीं तोंडीं कांहीं हातीं ।प्राण जाती निघोनी ॥८॥
तांतडी तांतडी जेऊं घाली ।तों तें जेवितां जेवितां कांहीं मेलीं ।
कांहीं होतीं धादावलीं ।तेंहि मेलीं अजीर्णें ॥९॥
ऐसीं बहुतेकें मेलीं ।येक दोनीं मुलें उरलीं ।
तेंहि दैन्यवाणीं जालीं ।आपलें मातेवांचुनी ॥१०॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मान और अपमान में,
निन्दा अस्तुति दोय ।
सन्त स्वाभाविक रहत हैं, छका अमीरस सोय ।।४०।।(स्वर्वेद प्रथम मण्डल अष्टम अध्याय) ०१/०८/४०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
अनुभवी संत जगात मान-अपमान आणि निंदा-स्तुती यात एकसमान सहज स्वाभाविक वृत्तीने राहून अमृत सोमरसाचे पूर्ण तृप्तीने पान करत पूर्ण आनंदात राहातात.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

.........................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## ब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आपण कोण आहोत याकडे विचार पुर्वक पहावे म्हणजे स्वरूप कसे आहे ते कळू शकते. स्वरूपा विषयी बोलणे थांबवून त्यांचे अखंड मनन करावे. मनन करता करता त्यामध्ये एकरूप व्हावे. अशा एक एक करत परमात्मा मध्ये एकरूप होवून जावे.महापुरूषांच्या आचार विचार व्यवहारात ही स्थिती बनते.

## गहिनीनाथ


आधुनिक केसरी

आणि पूर्ववत् 'येथून पुढे काही भय वगैरे नाहीना ?' असे विचारू लागला. त्यावर 'भय होते ते मागे राहिले, आतां काळजी न वाहतां स्वस्थ असावे' असे गोरक्षनाथाने उत्तर दिले. अशा उडवाउडवीच्या गोष्टी जेव्हा गोरख सांगू लागला तेव्हा मच्छिंद्रनाथ चकित झाला.मग त्याने आपणांस वीट मिळाल्याची हकीकत सांगितली व तिला कोणी चोरटे येऊन लुटून नेतील, ही मोठी मला धास्ती आहे, म्हणून बोलला. ते ऐकून गोरक्ष म्हणाला, अशाश्वत वित्त आता आपल्याजवळ नाही म्हणून भय देखील नाही ! हें ऐकून काहींतरी दगा झाल्याची कल्पना मच्छिंद्रनाथाच्या मनांत उद्भवली व त्यास तळमळ लागली. तेव्हा गोरक्षानें मच्छिंद्रनाथाचा हात धरला आणि उभयतांनी आपापल्या झोळ्या घेऊन पर्वतावर जाण्याची तयारी केली. निघण्यापूर्वी झोळी तपासतां झोळींत वीट नाही असे पाहून मच्छिंद्र गोरक्षास पुष्कळ टाकून बोलला व रडून त्याने एकच गोंधळ केला. त्या दुःखाने तो गडबडा लोळू लागला व मोठमोठ्याने रडून पिशाच्चासारखा चौफेर फिरू लागला. त्याने गोरक्षास नाही नाही ते बोलून शेवटी निघून जा. तोंड दाखवू नको, इतकेसुद्धा सांगितले. मच्छिंद्रनाथाचे ते काळजास झोंबणारे शब्द ऐकून देखील गोरक्ष उगाच राहिला व त्याचा हात धरून त्यास पर्वतशिखरावर घेऊन गेला. जातांना पर्वतावर गोरक्षाने सिद्धयोगमंत्र जपून लघवी केली. त्यामुळे तो सर्व पर्वत सुवर्णमय होऊन गेला. मग लागेल तितके सुवर्ण नेण्यास त्याने गुरूस विनंति केली. ते अघटित कृत्य पाहून त्याने गोरक्षाची वाहवा करून त्यास शाबासकी दिली आणि त्यास आलिंगन देऊन पोटाशी धरून म्हटले, बाळा गोरक्षा, तुझ्यासारखा परीस सोडून सोन्याला घेऊन काय करू ? अशा प्रकारच्या अनेक उपमा देऊन मच्छिंद्रनाथानें त्याची पुष्कळ वाखाणणी केली.

## नामाचे प्रेम येण्यासाठी खरी कळकळ पाहिजे

आधुनिक केसरी

नामाचे प्रेम का येत नाही, हा प्रश्न बहुतेकजण विचारतात. पण थोडासा विचार केला तर असे लक्षात येईल की, हा प्रश्नच बरोबर नाही. मूल न झालेल्या बाईने, ' मुलाचे प्रेम कसे येईल ?' असे विचारण्यासारखाच हा प्रश्न आहे. मूल झाले की प्रेम त्याच्याबरोबरच येत असते. तेव्हा, ' मुलाचे प्रेम कसे येईल ' हा प्रश्न करण्याऐवजी, 'मूल कसे होईल' याचाच विचार करणे बरोबर ठरेल. आपणसुद्धा प्रश्न करायचाच असेल तर ' नामाचे प्रेम कसे येईल ' असा करण्याऐवजी, ' मुखी नाम कसे येईल ' असा प्रश्न करणे बरोबर होईल. मुखी नाम यायला वास्तविक आडकाठी कोणाची आहे ? दुसऱ्या कोणाचीही नसून आपली स्वतःचीच आहे. वास्तविक, एकदा नाम घ्यायचे ठरवून सुरुवात केली की झाले. पण तसे होत नसेल तर, दोष दुसऱ्या कोणाचा नसून आपला स्वतःचाच आहे. म्हणून नाम घेणे हे आपले काम आहे; मग त्याच्या पाठोपाठ येणे हा प्रेमाचा धर्मच आहे. जसे आईच्या बाबतीत, मूल आणि प्रेमाचा पान्हा ही निराळी असूच



शकत नाहीत, तसे नाम आणि त्याचे प्रेम ही एकमेकांना सोडून राहूच शकत नाहीत. ह्यावरून एक गोष्ट अशी ठरली की, ' प्रेम का येत नाही ? ', याचे उत्तर आमच्याजवळच आहे, आणि ते म्हणजे, ' नाम घेत नाही म्हणून. ' यावर कोणी असे म्हणेल की, आम्ही नाम घेतोच आहोत, तरीही प्रेम का येत नाही ? हे विचारणे ठीक. पण आता आम्ही जे नाम घेतो म्हणून म्हणतो, त्याचा विचार केला तर काय दिसेल ? पोटी जन्माला आलेल्या मुलाबद्दल जसा कळवळा असतो, तसा नामाबद्दल आपल्या ठिकाणी कळवळा नसतो. सर्व संतांनी किंवा आपल्या गुरूने, नाम घ्यावे असे सांगितल्यामुळे आपण ते घेतो, किंवा दुसरे काही करायला नाही म्हणून घेतो, इतकेच. अर्थात्, तसे घेतले तरी आज ना उद्या आपले काम होईलच. पण ' प्रेम का येत नाही ? ', असा प्रश्न विचारण्यापूर्वी, आपण नाम किती आस्थेने घेतो, हा प्रश्न स्वतःला विचारणे जरूर आहे. एखाद्या बाईला फार दिवसांनी मूल झाले तर त्याच्याबाबतीत तिची जी स्थिती होते ती नामाच्या बाबतीत आपली होणे जरूर आहे. आपल्या देहाची वाढ जशी आपल्याला नकळत होते, तशी आपली पारमार्थिक उन्नतीही आपल्याला नकळत झाली पाहिजे. ती कळली तर सर्व फुकट जाण्याचा संभव असतो. परमार्थात ' मिळविण्यापेक्षा ' मिळविलेले ' टिकविणे ', हेच जास्त कठीण आहे. ज्याला ' मी काही तरी झालो ' असे वाटते तो काहीच झालेला नसतो. अशा माणसाने फारच सांभाळले पाहिजे.

**७. नवऱ्याला देव आवडत नाही म्हणून बायकोने नामस्मरण सोडण्याचे कारण नाही. तिने नाम घेतले तर धर्म सोडला असे न होता उलट संसार सुखाचा होईल.**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, १६ जानेवारी २०२४
adhunikkesari.com Adhunik Kesari

# आजच्या पिढीने मैदानी खेळात सहभागी होणे काळाची गरज

## खा. डॉ. प्रितम मुंडे : उत्कृष्ट नियोजनाबद्दल आ. सुरेश धस यांनी केले सचिन जायभाये यांचे कौतुक

आधुनिक केसरी न्यूज


**शिरूर कासार :** तालुक्यातील शेरेवडी येथे रविवारी नमो चषक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आणि बक्षीस वितरण समारंभ पार पडला. यासाठी बीड जिल्हाच्या लोकप्रिय खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे आणि विधान परिषदेचे आमदार सुरेश आण्णा धस यांच्या प्रमुख उपस्थितीत विजेत्या संघाला बक्षीसांचे वाटप करण्यात आले.

यावेळी मोठ्या संख्येने भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थितीत होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन भारतीय युवा मोर्चाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य, तथा संचालक, भारतीय खाद्य निगम भारत सरकार सचिन जायभाये यांनी केलं.

नमो क्रिकेट स्पर्धेत बीड, गेवराई, पाथर्डी आदी तालुक्यातील तरुणांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला. मोदी सरकारच्या या संकल्पनेमुळे ग्रामीण भागातील तरुणांच्या कला-गुणांना वाव मिळाला असून तरुणांसाठी अशा नवीन संधी पक्षाअंतर्गत उपलब्ध करून देण्यात येतील, असं आवाहन यावेळी आ. सुरेश आण्णा धस यांनी दिलं.

यावेळी प्रितम मुंडे यांनी तरुणांना संबोधित केलं. त्यांनी मैदानी खेळाचं महत्त्व अधोरेखित करत तरुणांसाठी क्रिडांगणाच्या उभारणीसाठी भरीव निधी मिळवून देण्याची ग्वाही दिली. तथापी, यावेळी सचिन जायभाये यांनी क्रिडांगणाची मागणी करत जिल्ह्यात युवा वारियर्सच्या शाखा सुरू करण्याची संकल्पना मांडली.

या स्पर्धेत तागडगाव येथील संघाने प्रथम क्रमांक (२१००० हजार) मिळवला. तसेच बारगजवाडी येथील संघाने द्वितीय क्रमांक (१५००० हजार), चिंचपूर - तृतीय क्रमांक(११००० हजार) असे पारितोषिक पटकावले. तथापी, 13 जानेवारीला भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने शेरेवाडी (पिंपळनेर फाटा) शिरूर कासार जि. बीड येथे 'नमो चषक' क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन सिद्धेश्वर संस्थानचे मठाधिपती अतुल शास्त्री महाराज, भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, माजी आमदार भिमरावजी धोंडे यांच्या हस्ते करण्यात आले होते. यावेळी शिरूर नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर, पाटोदा नगराध्यक्ष राजू भय्या जाधव, भाजपा तालुका अध्यक्ष सुरेश उगलमुगले, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष विवेकजी पाखरे, उप-नगराध्यक्ष प्रकाश देसरडा, जि.प.सदस्य रामराव खेडकर, रामदास बडे, शिवाजी पवार, अभियंता कृष्णा पानसंबळ, समाज कल्याण अधिकारी लक्ष्मण बारगजे, प्रकाश खेडकर, कल्याण तांबे, बाळासाहेब केदार, भरत खरमाटे, वारणी सरपंच ज्ञानदेव केदार, तागडगांवचे सरपंच नवनाथ सानप, मिथुन डोंगरे, सुदाम काकडे, दिलीप जायभाये पदाधिकारी यावेळी उपस्थीत होते. या उपक्रमाचे नियोजन व सूत्रसंचलन संजय आघाव यांनी तर बारगजवाडी येथील युवकांनी पुढाकार घेत कार्यक्रम यशस्वी केला.





## भाजपा वैद्यकीय आघाडी तालुकाध्यक्षपदी डॉ. टिळे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** भारतीय जनता पक्षाच्या वैद्यकीय आघाडी कक्षाच्या फुलंब्री तालुका अध्यक्षपदी डॉ. गोविंद टिळे तालुका अध्यक्षपदी निवड झाली असून त्यांच्या फुलंबी डॉ.असोशियनचे अध्यक्षपद अधिकारी व सर्व सदस्य यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ.मनोज गाडेकर डॉ. देशमुख, डॉ. विवेक पाटील डॉक्टर माने डॉ. गणेश डोईफोडे, डॉ. आयाज पटेल, डॉ. शिंदे, डॉ.प्रवीण शिरसाट व इतर सदस्य हजर होते.

## आंबेडकरांची शपथ, गुरुवारी विनोद वाईन शॉप फुटणार!

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या मागील बाजूस असलेले विनोद वाईन शॉप हटवण्यासाठी आझाद समाज पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आनंद लोंढे हे अनेक दिवसापासून लढा देत आहेत त्यांनी अनेक दिवसापासून माहिती गोळा केली असल्याची माहिती पत्रकार परिषदेत येथे देण्यात आली.

आमच्यावर कितीही खोटे गुन्हे दाखल करा तरीही आम्ही माघारी घेणार नाही 18 तारखेला वाईन शॉप फोडले जाईल असे या ठिकाणी सांगण्यात आले.

काही दिवसांपूर्वी पाठपुरावा करत असताना विनोद वाईन शॉप च्या मालकाने याविरुद्ध आयुक्ताकडे अपील केली होती त्यात असे म्हटले होते की मुळातच बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा अधिकृत आहे. तेथे बसवण्याची परवानगी नाही, असे वादग्रस्त वक्तव्य केल्यामुळे यांच्याविरुद्ध अॅट्रॉसिटी अॅक्ट गुन्हा दाखल करण्याची मागणी देखील आझाद समाज पार्टीने केली आहे. या ठिकाणी बनावट दारू देखील विकण्यात येते असा आरोप देखील करण्यात आला आहे. या प्रकरणात राज्य उत्पादन शुल्क देखील समावेश असल्याचा आरोप केला आहे उत्पादन शुल्क यांनी 1996 ते 2010 पर्यंत ची माहिती देण्यास टाळाटाळ केली याचा अर्थ असा कि यांच्याकडे कुठलाही पुरावा नाही. हे दुकान काही वर्षांपूर्वी केवल रमानी यांच्या नावे होते त्यानंतर विनोद वाईन शॉप स्थलांतरित होई पावत




सविता नरेश गलानी यांच्या नावावर कसे झाले...?असा पुरावा सहित आनंद लोंढे यांनी प्रश्न मांडला. सदर अनुज्ञप्ती एका नावावरून दुसऱ्या नावावर कशा पद्धतीने स्थलांतरित झाली याबाबत स्थानिक प्रशासनाकडे कुठलाही पुरावा नसल्याने व राज्य उत्पादन शुल्क यांनी कागदपत्र गहाळ झाल्याचे उत्तर देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे त्यांच्यावर देखील कारवाईची मागणी आम्ही केली आहे. आम्हाला महिनाभर जेलमध्ये ठेवले तरी आम्हाला परवा नाही परंतु अनेक वर्षापासून होत असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विटंबना चा अपमान आम्ही सहन करणार नाही आमच्या सोबत समाजातील सर्व पक्ष व संघटना या ठिकाणी एक जुठ होणार आहेत व येणाऱ्या 18 जानेवारीला आम्ही ते वाईन शॉप फोडू, असे वार्ताहर यांना सांगण्यात आले.



## राज्य क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** ज्ञानकुंज कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल स्कूल येथे महाराष्ट्र राज्य क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आल्या ऑलिंपिकवीर स्वर्गीय खाशाबा जाधव यांचा जन्मदिन `राज्य क्रीडा दिन ` म्हणून क्रीडा संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी महाविद्यालयामध्ये मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आल्या या स्पर्धे मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये कु. ऊद्धव बाबासाहेब विटेकर - प्रथम व कु. ऋषिकेश विजय बाहुले - दुवितीय व कु. कुणाल रमेश नलावडे - तिसरा आला आहे. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झिंजुर्के प्रा. मनोज राणे, प्रा. नितीन पवार, प्रा.राम राठोड,प्रा.कृष्णा चव्हाण,प्रा.योगेश सुरडकर,प्रा.दीपक पाटील,प्रा.राहुल गायकवाड,श्री भूषण जाधव,श्री.अविनाश कोलते,खान मॅडम ,श्रीमती पाचवने मॅडम,श्रीमती चोपडे मॅडम, शिपाई धुमाल बाबा, वाहतुळे मावशी यांची उपस्थिती होती.

## सुलतानपूर येथे मकरसंक्रात उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** येथे सोमवारी मकर संक्रांतीचा सण पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सुवासिनी महिलांनी एकमेकींना वाण देऊन मकर संक्रांतीचा सण साजरा केला. सुलतानपूर सह परिसरात मंदिरे महिलांच्या गर्दीने फुलून गेली होती. दिवाळीनंतर येणारा महत्त्वाचा सण म्हणून मकर संक्रांतीचे महत्त्व आहे. त्यासाठी महिलांनी नवे कपडे व दागिन्यांची खरेदी केली होती. या वेळी महिलांनी विठ्ठल-रुक्मिणीच्या मंदिरांमध्ये मोठी गर्दी केली होती.

सकाळी दहा वाजल्यापासून सायंकाळी उशिरापर्यंत महिलांची गर्दी कायम होती. एकमेकींना तीळगूळ देऊन गोडीगुलाबीने राहण्याचे वचन सर्व महिलांनी एकमेकींना दिले. महिलांनी सुगडांची पूजाही केली. या वेळी पुजारी नाना जोशी यांनी संक्रतीचे अध्यायन करून संक्रातीचे महत्व समजावून सांगितले.

## नवी यात्रा

आधुनिक केसरी

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेला आज मणिपूरमधून सुरुवात झाली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी यावेळी भारत जोडो न्याय यात्रेला हिरवा झेंडा दाखवला. राहुल गांधी यांनी यावेळी मणिपूरच्या मुद्यावरुन पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्र सरकार, भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर हल्लाबोल केला आहे. आजपर्यंत भारताच्या पंतप्रधानांना मणिपूरला जाण्यासाठी वेळ मिळाला नाही, अशी टीका राहुल गांधी यांनी केली. नरेंद्र मोदी, भाजप आणि आरएसएससाठी कदाचित मणिपूर भारताचा भाग नसेल, असे राहुल गांधी म्हणाले.
काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेला आज मणिपूरमधून सुरुवात झाली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी यावेळी भारत जोडो न्याय यात्रेला हिरवा झेंडा दाखवला. राहुल गांधी यांनी यावेळी मणिपूरच्या मुद्यावरुन पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्र सरकार, भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर हल्लाबोल केला आहे. आजपर्यंत भारताच्या पंतप्रधानांना मणिपूरला जाण्यासाठी वेळ मिळाला नाही, अशी टीका राहुल गांधी यांनी केली. नरेंद्र मोदी, भाजप आणि आरएसएससाठी कदाचित मणिपूर भारताचा भाग नसेल, असे राहुल गांधी म्हणाले. आम्हाला कन्याकुमारी ते काश्मीर या पहिल्या भारत जोडो यात्रेप्रमाणं ही यात्रा पूर्व ते पश्चिम करायची होती. यात्रा सुरु करण्यापूर्वी अनेकांनी सूचना दिल्या. पण मी भारत जोडो न्याय यात्रा मणिपूरपासून सुरु होऊ शकेल, असे म्हटलं. आम्हाला द्वेष मिटवून भारताला एका सूत्रात बांधायचं आहे. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने आपल्याकडे वेळ कमी असल्याने हायब्रीड स्वरुपात यात्रा सुरु करत आहोत. भारत जोडो न्याय यात्रेत यावेळी बसेसचा वापर होणार आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी मणिपूरच्या थौबलमधून भारत जोडो न्याय यात्रेला हिरवा झेंडा दाखवला. दिल्लीहून या यात्रेच्या शुभारंभासाठी काँग्रेसशासीत राज्यांचे मुख्यमंत्री, प्रमुख नेते उपस्थित होते. दरम्यान, मणिपूरमधून आजपासून सुरु झालेली भारत जोडो न्याय यात्रा २० मार्च रोजी मुंबईत पोहोचणार आहे. ही यात्रा १०० लोकसभा मतदारसंघातून प्रवास करेल. या यात्रेत इंडिया आघाडीतील नेत्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन काँग्रेसतर्फे करण्यात आले आहे.



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

## तीळगुळाची गोडी फेसबुक, व्हॉटसअपवरच

आधुनिक केसरी

**मकर संक्रांत भारतीय हिंदु संस्कृतीमध्ये पिढ्यान पिढ्यापासुन चालत आलेला उत्सव आहे. अर्थात या उत्सवाला अध्यात्मिक आणि धार्मिक आधार वेगवेगळे असले तरी हा उत्सव महिलांचा म्हणुन ओळखल्या जातो. तीळगुळ घ्या अन् गोड गोड बोला दोन मनाचं संक्रमण आणि त्यातुन नात्याची जडणघडण यासाठी पण उत्सव महत्वाचा आहे. एक महिना उत्सव चालतो. हिवाळा संपतो आणि उन्हाळ्याच्या तोंडावर उत्सव असतो. अर्थात मकर संक्रांत झाली म्हणजे उन्हाळा सुरू झाला असाही अर्थ असतो. महिलांच्यासाठी वीस दिवस हळदी-कुंकु असते. काळा रंग एरवी अशुभ म्हणुन ओळखला जातो.**

मात्र मकर संक्रांतीला शुभ मानला जातो. म्हणुन महिलांची साडी नाही म्हटलं तरी काळ्या रंगाची असते. गाठीभेटी घेत तीळगुळ एकमेकांना द्यायचे प्रत्यक्ष संवाद करायचा आणि ऋणानुबंध वाढवायचा असं एकुण स्वरूप मानवी समाजात उत्सवाचं आहे. मात्र अलीकडे एकुणाच व्यवस्थेला परिवर्तन मोठ्या प्रमाणावर झालेलं दिसत आहे. सद्य स्थितीत तिळगुळाची गोडी फेसबुक, व्हॉटसअपवर आली आणि प्रत्यक्ष संवादाची नाती तुटली.कारण आज बसल्या ठिकाणी आपण शेकडो लोकांना व्हॉटसअपवर तिळगुड देतो.मात्र प्रत्यक्ष गाठीभेटी जावुन सोपस्कार पाडणे नको वाटते. आधुनिक तंत्रज्ञानातला बदल एकमेकांपासुन माणसं तोडण्याला कारणीभुत ठरतो की काय?अशी भिती पुढे येत आहे. नाही म्हटलं तरी आज पंच्याहत्तर टक्के तीळगुळ मोबाईलवर मिळतात ज्यामुळे प्रत्यक्ष संवाद होत नाहीत आणि माणसाचे मनं एकमेकाला कळत नाहीत. हे सामाजिक चित्र भविष्यात फार चांगलं आहे असंही म्हणता येणार नाही. भारतीय संस्कृती सामाजिक परिवर्तनासाठी आणि रूढी परंपरा जपताना वर्षानुवर्षे ऋणानुबंध टिकवुन ठेवण्यासाठी प्रभावशाली म्हणुन ओळखल्या जाते. हिंदु रितीरिवाजामध्ये वेगवेगळे धार्मिक उत्सव वर्षभर चालत असतात आणि तेही कधी पुरूषांचा उत्सव तर कधी महिलांचा उत्सव, महालक्ष्मी, मकर संक्रांत, पंचमी म्हटलं की महिलांचा उत्सव म्हणुन ओळखल्या जातो.बैल-पोळा शेतकऱ्यांचा उत्सव म्हणुन तर दिवाळी उत्सव हा बहिण-भावासाठी म्हणुन ओळखला जातो. विजया दशमी स्वतंत्र पुरूष यांच्यासाठी उत्सव आहे. अर्थात ऋतुमानाप्रमाणे उत्सवाची निर्मिती हिंदु समाजात करण्यात आली. त्यामागे धर्मशास्त्र आणि त्याचे अर्थ अनेक आहेत. मकर संक्रांत थंडीच्या दिवसात का?तर कदाचित तिळासारखे स्निग्ध पदार्थ जास्त खाण्यात यावेत ज्यातुन शारीरिक सदृढता वाढते. हा दृष्टीकोन ईश्वर निर्मित परंपरेनुसार चालत आलेला आहे. अलीकडच्या काळात उत्सवाचं स्वरूप बदलत आहे. पुर्वी मकर संक्रांत म्हटलं की, तीळगुळाचे पुडे खिशाच्या पाकिटात ठेवायचे आणि एकमेकांना प्रत्यक्ष भेटुन तीळगुळ द्यायचे. वयाने छोटी माणसं मोठ्यांना तीळगुळ देतात आणि त्यांचा आशिर्वाद घेतात. मग त्यासाठी शिष्यानं गुरूच्या घरी जायचं किंवा नातेवाईकांचे आशिर्वाद घेण्यासाठी जायचं. तिथे संवाद आणि चर्चा. मनाचा एकोपा आणि ऋणानुबंध निर्माण होण्यासाठी हे निमित्त फारच चांगलं असायचं. मकर संक्रांत महिलांचा सण म्हणुन ओळखला जात असला तरी तिळगुळ एकमेकांना आदानप्रदान करून नात्याची गोडी वाढवणे हा पण उद्देश असायचा. मकर संक्रांतीच्या दिवशी विठ्ठल-रूक्माईच्या मंदिरात मोठ्या प्रमाणावर महिलांचं एकत्रीकरण आणि मग तिथुन पुढे किती तरी दिवस उत्सवाचा थाटमाट सुरू असतो. आजही महिला मोठ्या प्रमाणावर एकमेकांच्या घरी हळदी-कुंकु घेण्यासाठी जात्ाात. ज्याला आवा लुटणं घेणे आणि देणं असं म्हणतो आणि पुरूष एकमेकांना तीळगुळ देतात. कालपरत्वे प्रत्येक सण उत्सवात परिवर्तन झालेलं आहे. आज डिजिटल जमान्यात वाण देण्यासाठी वेगवेगळ्या वस्तु पण स्वरूप तेच.मात्र आजची सामाजिक घडी आणि माणसाची मने पुर्वीसारखी स्वच्छ राहिली अशी नव्हे. जुन्या काळात मनाचं संक्रमण ऋणानुबंध वाढवणारं असायचं. ज्यातुन विश्वास आणि आपुलकी निर्माण व्हायची व नाती टिकायची. आज तसं नाही. कारण प्रत्येक माणुस स्वतःसाठी जगतो. परोपकारी भावना कमी झाली असुन एकलेपणा हे मानवाचं वैशिष्ट्य पुढे आलं आहे. आज मोबाईल क्रांती व समाजात झालेलं परिवर्तन वाऱ्याच्या वेगासारखं आहे. कारण बदलत्या युगात माणुसकीचा विसर लोकांना पडला आहे. त्याहुन अधिक प्रत्यक्ष संवाद आणि गाठीभेटी यातही जास्त रस राहिला नाही. कारण फेसबुक, व्हॉटसअप, सोशल मिडिया याच्या अधिन समाज जास्त जाताना दिसतो आहे. आजही केवळ मकर संक्रांत नव्हे तर महापुरूषांच्या जयंत्या किंवा इतर उत्सव डिजिटल होवुन बसले आहेत. शेजारी राहणारे माणसं एक एक महिना भेटत नाहीत. संवाद करत नाहीत. त्याचं कारण पहाटे उठल्याबरोबर मोबाईलचं ठोकडं हातात येतं, गुडमॉर्निंग किंवा चहाचा कप टाकुन नमस्कार घातल्या जातो. एकमेकांना घरी बोलावणे, सोबत नाश्ता करणे, जेवणावळी, आदानप्रदान या गोष्टी आता इतिहासजमा होत आहेत. तीळगुळाची गोडी फेसबुक, व्हॉटसअपवर आली म्हणुन संवादाची प्रत्यक्ष नाती तुटली. आज लोकांना खिश्यात तिळगुळ ठेवणे म्हणजे कुठे तरी मेट्रो प्रोफाईल जीवनात वेगळेपणा वाटतो अशी मानसिकता होत आहे. पण खरा आनंद प्रत्यक्ष भेटीत मिळतो. तो फेसबुक, व्हॉटसअपवर मिळु शकत नाही हे तितकंच खरं.पण माणुस स्वामीनिष्ठ झाला ज्यातुन एकटेपणाच्या आहारी जात आहे. संक्रांत कुणावर बसणार? याची वाट पाहणारे डोळे जास्त वाढले आहेत. प्रत्यक्ष संवाद करण्यासाठी गाठीभेटी नको वाटतात. नव्या पिढीतील मुलं एकमेकांच्या नातेवाईकांकडे जाताना दिसत नाहीत. वाढदिवस ज्याप्रमाणे फेसबुक, व्हॉटसअपवर आले त्याचप्रमाणे तीळगुळाचे झाले. दुसरीकडे महिलांचं आजही बरं आहे. नाही म्हटलं तरी बऱ्यापैकी महिला वर्ग हळदी-कुंकवाच्या निमित्ताने आजही संवाद करतात आणि त्यातुन ऋणानुबंध चांगला वाढतो. याउलट हळदी-कुंकाचे स्वरूप खर्चीक झाले असले तरी वाणामध्ये वेगवेगळ्या नाविन्यपुर्ण वस्तु आणल्या जातात. पुरूष मात्र प्रत्यक्ष तीळगुळ हातावर ठेवताना कमी दिसतात. कारण मोबाईलचं ठोकडं हातात घेवुन बसल्या ठिकाणी यादीतुन तीळगुळ पाठवतात. ज्यामुळं स्नेहाची गोडी फार टिकेलच असे नव्हे. नवीन पिढीतल्या युवकांनी उद्याच्या मकर संक्रांतीनिमित्त मोबाईलवर तीळगुळ न देता नातेवाईक, मित्र, गुरू यांची प्रत्यक्ष भेट घेवुन तीळगुळाची व संवाद करण्याची प्रतिज्ञा खऱ्या अर्थाने करायला हवी. कारण फेसबुक, व्हॉटसअप यातुन निर्माण होणारी नाती फार टिकतील असे नव्हे. दोन जीव एकत्र येतात.पण काही दिवसात घटस्फोट होतात. अशा अनेक घटना आपण पाहतो. त्याप्रमाणे मनाचं मिलन ऱ्हदयातुन व्हायचं असेल तर तीळगुळ प्रत्यक्ष हातावर द्या आणि घ्या. बघा अनुभव आणि आपले नाते कसे टिकुन रहाते ते? डिजिटल जमान्यात मोबाईलच्या आहारी जाणं भावी पिढीसाठी फार चांगलं आहे असंही नव्हे. उद्या प्रेमाचा नमस्कार हात जोडणारं चित्र पाठवुन केला जातो. काही दिवसात दोन पाय असलेलं चित्र आणि मग तोच आशिर्वाद दर्शन स्वरूपाने निघालं तर आश्चर्य वाटायला नको. चला तर बघु उद्याच्या मकर संक्रांतीत तीळगुळ देवु आणि गोड गोड बोलु.





श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

## स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे !

आधुनिक केसरी

**किराणा घराण्याच्या जेष्ठ गायिका, ज्यांनी आपल्या गायन कलेने शास्त्रीय संगीताला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले त्या स्वरयोगिनी डॉ प्रभा अत्रे यांचे शनिवारी वृद्धपकाळाने निधन झाले. १३ सप्टेंबर १९३२ रोजी पुण्यात जन्मलेल्या प्रभा अत्रे यांच्या घरची परिस्थिती बेताचीच होती तरीही त्यांनी शास्त्र पदवी घेऊन कायद्याचं शिक्षण घेतले. संगीत क्षेत्रात त्या अपघातानेच आल्या. सुरवातीच्या काळात विजय करंदीकर यांच्याकडून त्यांना रागाचा परिचय झाला पुढे जेष्ठ गायिका हिराबाई बडोदेकर व त्यांचे बंधू सुरेशबाबू माने यांच्याकडून शास्त्रीय संगीताचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेऊन त्यांनी गायनाला सुरुवात केली. ख्याल गायकीसह ठुमरी, दादरा, गझल, उपशास्त्रीय संगीत, नाट्य संगीत, भजन व भावगीत यांवर त्यांचे प्रभुत्व होते. आपल्या कार्यक्रमात त्या अनेकदा स्वतः रचलेल्या बंदिशी गात.**

त्यांनी स्वतःच्या स्वतंत्र शैलीत संगीतातील नवे राग निर्माण केले. शास्त्रीय संगीताचा जगभर प्रसार व्हावा म्हणून त्यांनी डॉ प्रभा अत्रे फाऊंडेशनची स्थापना केली. या फाऊंडेशनच्या मार्फत त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीताचा जगभर प्रचार केला. भारतीय शास्त्रीय संगीताचा जगभर प्रसार करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. डॉ प्रभा अत्रे फाऊंडेशन स्थापना आणि पुणे येथे स्वरमय गुरुकुलची स्थापना करून त्यांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. मार्गदर्शन केले. त्यांच्या अनेक शिष्यांनी पुढे संगीतात स्वतः चे स्थान निर्माण केले. त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी संगीत कलेत डॉक्टरेट पदवी मिळवली आहे. त्यांनी आकाशवाणी पुणे व नागपूर केंद्राच्या संगीत विभाग प्रमुख म्हणून त्यांनी काही काळ नोकरी केली. त्यानंतर एस एन डी टी विद्यापीठाच्या संगीत विभागाच्या प्रमुख म्हणूनही जवळपास दहा वर्ष त्या कार्यरत होत्या. डॉ प्रभा अत्रे या केवळ शास्त्रीय गायिकाच नव्हत्या तर त्या संगीत रचनाकार, लेखिका, प्राध्यापिका आणि विदुषीही होत्या. त्यांनी इंग्रजी व हिंदी भाषेत संगितावर अनेक पुस्तके लिहिली आहेत.आपल्या सांगीतिक प्रवासाचे वर्णन त्यांनी त्यांच्या स्वरमयी या आत्मचरित्रात केले आहे. त्यांनी जवळपास दोनशेच्या वर बंदिशी लिहिल्या असून स्वराली, अंतस्वर ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांनी जवळपास ११ पुस्तके प्रकाशित केली आहेत. प्रभा अत्रे यांनी आपले संपूर्ण आयुष्य शास्त्रीय संगीताचा प्रचार आणि प्रसार करण्यात घालवले. त्यांच्या संगीत कलेची दखल घेऊन त्यांना अनेक संस्थांनी पुरस्कार देऊन गौरविले आहे. आचार्य अत्रे संगीत अवॉर्ड, पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचा पुरस्कार, मुंबई दूरदर्शनचा स्वररत्न पुरस्कार, मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर पुरस्कार, दीनानाथ मंगेशकर पुरस्कार असे विविध मानाचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. भारत सरकारनेही त्यांना पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण हे तिन्ही मानाचे पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने शास्त्रीय संगीताचा एक आयाम संपला आहे. स्वर योगिनी डॉ प्रभा अत्रे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



## अज्ञाताकडून पशुवैद्यकीय दवाखान्याचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातीलसुलतानपूर येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या पाठीमागील बाजूच्या खिडकीचे गज वाकवून कोणीतरी अज्ञाता व्यक्तीने शनिवारी ( दि. 13 ) मध्य रात्री दवाखान्यात प्रवेश करून साहित्याचे नुकसान केले. सकाळी साडेआठ वाजता कर्मचारी दवाखाना उघडण्यासाठी गेले असता दवाखान्यातील खुर्च्या अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या. तर कपाटाचे दार तोडलेले होते, व दवाखान्याच्या साहित्याची नासधूस केलेली निदर्शनास आली. कर्मचारी संदीप घुले, नानासाहेब दांगोडे, यांनी ही बाब पशुधन विकास अधिकारी देविदास देशमुख यांना कळविली त्यावेळी त्यांनी दवाखान्यात येऊन पाहणी करून खुलताबाद पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदवली आहे.

जून 2023 मध्येही याच प्रमाणे अज्ञाता व्यक्तीने नुकसान केले होते. असे प्रकार नेहमी घडू नये म्हणून शसना कडून येथे रखवालदार नेमण्यात यावा असे पशुधन विकास अधिकारी देविदास देशमुख यांनी सांगितले.

# सियावर रामचंद्र की जयचा होणार विश्वविक्रम

## सुधीर मुनगंटीवार यांची पत्रकार परिषदेत माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 22 जानेवारीला अयोध्येमध्ये राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याच्या शुभ मुहूर्तावर चंद्रपूरमध्ये सुद्धा राममय वातावर निर्माण व्हावं आणि याच प्राणप्रतिष्ठा महोत्सवाच्या शुभ मुहूर्तावर चंद्रपूरमध्ये राम नामा वरचा सर्वात पहिला विश्वविक्रम स्थापन व्हावा यासाठी चंद्रपूरमध्ये सियावर रामचंद्र की जय या 11 अक्षरी मंत्राचा गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद व्हावे या दिशेने प्रयत्न सुरू झाला आहे. अशी माहिती महाराष्ट्राचे वन सांस्कृतिक कार्यमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी स्थानिक एनडी हॉटेल येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये दिली . स्थानिक चांदा क्लब ग्राउंड येथे या विश्वविक्रमाची तयारी जोरात सुरू झालेली असून श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालयाच्या माध्यमातून हा विश्वविक्रम केला जाणार आहे. संपूर्ण जगामध्ये राम मय वातावरण तयार होत असताना आणि अयोध्येमध्ये प्रभू श्रीरामचंद्राचा प्राणप्रतिष्ठा सोहळा होत असताना चंद्रपूर मध्ये सुद्धा वातावरण निर्मिती व्हावी या अनुषंगाने 20 ते 22 जानेवारी यादरम्यान भव्य कार्यक्रमांच आयोजन करण्यात आलेल आहे. 20 जानेवारी रोजी स्थानिक चांदा क्लब ग्राउंड येथे सियावर रामचंद्र की जय असं लिहिलेल्या पणत्या उजळवून हा विश्वविक्रम गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदल्या जावा यासाठी प्रयत्न केला जात आहे. सांस्कृतिक कार्य विभागाकडून दिनांक 21 आणि 22 जानेवारी या दोन दिवशी विशेष आकर्षक अशा कार्यक्रमांचा आयोजित करण्यात आलेला आहे. यामध्ये अभिनेता पुनीत इस्सार यांच्या रामायण या नाटकाचा प्रयोग दिनांक 21 जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजता होणार आहे .अति भव्य स्वरूपातील या नाटकामध्ये 50 पेक्षा जास्त कलावंत काम करणार आहेत. रामायणातील अनेक महत्त्वाच्या प्रसंगावर आधारित हे नाटक चंद्रपूरकरांना निश्चितच आवडेल असा आशावाद यावेळी मुनगंटीवार व्यक्त केला . तर 22 जानेवारीला सुविख्यात महिला तबलावादक अनुराधा पाल यांचा गीतरामानाचा कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे. सुविख्यात कोरिओग्राफर सुभाष नकाशे हे दीडशे ते दोनशे कलाकारांना घेऊन रामायण संबंधित सादरीकरण सादर करणार आहेत . यामध्ये नृत्य, नाट्य, गीत, गायन ,वादन यांचा समावेश असणार आहे .ग दि माडगूळकर व बाबूजी यांच्या अविष्कारातून साकार झालेल्या गीतरामांमधील काही गाणी व त्यावर आधारित सादरीकरण यावेळेस अनुभवता येणार आहे. या कार्यक्रमाची सुरुवात राम जन्मला ग सखे राम जन्मला या पाळण्याने तर शेवट प्रभू श्रीरामचंद्र यांच अयोध्येत आगमन झाल्यानंतर झालेला जल्लोष आणि राज्याभिषेक दाखवण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला चंद्रपूर जिल्ह्यातील नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद द्यावा व या संपूर्ण कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी पत्रकार परिषदेत केले.




**ताडोबाच्या जंगलात जटायू घेणार उंच भरारी :** 22 जानेवारीला अयोध्या येथे होणाऱ्या प्रभू श्रीरामांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या अनुषंगाने जगप्रसिद्ध असलेल्या ताडोबा जंगलामध्ये सात जटायूंना आकाशात मोकळ सोडण्यात येणार आहे . रामायणा मध्ये जटायूचे एक वेगळे महत्त्व आहे . रामायणातील जटायूचा हाच महत्त्वाचा धागा पकडत राजस्थान येथून आणलेले सात जटायू ताडोबाच्या झरी येथील जंगलामध्ये आकाशात उंच भरारी घेण्यासाठी सोडण्यात येणार . जटायू चे संवर्धन करण्याच्या दृष्टिकोनातून हा निर्णय घेण्यात आला असून टप्प्याटप्प्याने इतर जंगलातही जटायुंना मोकळे सोडण्यात येणार असल्याची माहिती सुद्धा यावेळी पत्रकार परिषदेत सुधीर मुनगंटीवार यांनी दिली .

## शंकरपटाला झाली सिल्लोड येथे सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** राज्याचे पणन व - अल्पसंख्याक विकास मंत्री ना. अब्दुल सत्तार यांच्या संकल्पनेतून तसेच सिल्लोड नगर परिषद आयोजित सिल्लोड महोत्सव अंतर्गत तीन दिवसीय भव्य राज्यस्तरीय शंकरपट बैलगाडा शर्यत दि. दि.१५ जानेवारी पासून सुरुवात करण्यात आली आहे. सिल्लोड शहरातील भराडी रोडवरील सूतगिरणी मैदान येथे मंत्री ना. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते या शंकरपटाचे उदघाटन होणार असल्याची माहिती सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना सांगितले आहे.सदरील शंकरपट हा दि.१५, १६ आणि १७ जानेवारी असे तीन दिवसीय हा शंकरपट चालणार आहे. यात सामान्य आणि स्थानिक असे दोन गट करण्यात आले आहे. सामान्य गटात प्रथम विजेत्या बैलजोडी मालकास होंडा युनिकोर्ण मोटर सायकल, द्वितीय विजेत्यास होंडा शाईन, तृतीय विजेत्यास ५१ हजार रुपये रोख, चौथा क्रमांक विजेत्यास ४१ हजार तर स्थानिक गटात प्रथम विजेत्यास होंडा शाईन मोटर सायकल यासोबतच सामान्य गटात क्रमांक ५ ते २० पर्यंत १६ विजेते तर स्थानिक गटातील द्वितीय क्रमांक ते १० पर्यंत ९ पर्यंत असे एकूण ३० गुणानुक्रमे विजेत्यास जवळपास २ लाख ५० हजार रुपयांची रोख बक्षिसे देण्यात येणार आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त मोठ्या संख्येने शंकर पट धारकांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे.



## स्व. शंकरराव गवळी विद्यालयात दशरात्रोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

शंकर सदार

**अमानी :** येथील स्व.शंकरराव गणुजी गवळी विद्यालयात दि. ०३ जानेवारी २०२४ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती पासून ते दि.१२जानेवारी २०२४ राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंती पर्यंत दशरात्रोत्सव संपन्न झाला.या दहा दिवसीय कार्यक्रमांमध्ये विद्यालयात क्रीडा सप्ताह हा सुद्धा घेण्यात आला.

यामध्ये विद्यार्थ्यांना मातीतले विविध खेळ, धावणे स्पर्धा,तसेच वर्ग ८,९,१० च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा,वेशभुषा स्पर्धा, पाढे स्पर्धा, रांगोळी स्पर्धा,पुस्तक वाचन स्पर्धा घेण्यात आली. तसेच (दि.०३)जानेवारी रोजी सर्व विद्यार्थ्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेमध्ये येऊन विद्येची खरी आराध्यदैवता सावित्रीबाई फुले यांना खरी आदरांजली वाहली.

त्यानंतर (दि.11)जानेवारी रोजी मुख्यमंत्री 'माझी शाळा, सुंदर शाळा' या उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री यांनी दिलेले पत्रक सर्व विद्यार्थ्यांना वाचनासाठी दिले व यामधून 'माझी शाळा, सुंदर शाळा' हा उपक्रम विद्यार्थ्यांना अवगत करून देऊन त्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष श्री अनिल भाऊ गवळी यांनी केले.

दि.१२ जानेवारी २०२४ रोजी विद्यालयात राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांचे संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. यामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अनिल गवळी सचिव सौ. रेखाताई गवळी तसेच पालक वर्गातून महिला बचत गटाच्या अध्यक्षा सौ.भंडारी तसेच प्रेरणा प्रतिष्ठानचे अध्यक्ष भगवानराव गवळी हे उपस्थित होते.

यावेळी विद्यालयातील विद्यार्थिनींनी राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांची वेशभूषा परिधान करून जयंती साजरी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. गायत्री गवळी हिने तर प्रास्ताविक ऋतिका गवळी व आभार प्रदर्शन कु. मुक्ता गवळी हिने केले यावेळी विविध विद्यार्थ्यांनी भाषणे व गीते सादर केली व कार्यक्रमाची सांगता जिजाऊ वंदनेने करण्यात आली.या सर्व कार्यक्रमासठी सांस्कृतिक विभाग प्रमुख .व्ही. के.खिल्लारे व .पी.एस.सरनाईक, क्रीडा विभाग प्रमुख श्री.नितेश भिंगे, स्पर्धा परिक्षा प्रमुख .आर.बी.नव्हाळे यांनी काम पाहले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी.ओ.एल.सरकटे .व्ही. बी.गवळी, डी.जी.तागड, एस.एस. ठाकरे इ.नी अथक परिश्रम घेतले.

## जिजामाता जयंतीनिमित्त समुपदेशन केंदात कायदेविषयक मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज



**सिल्लोड :** येथे जिजामाता जयंतीनिमित्त महिला समुपदेशन केंद्र सिल्लोड शहर पोलीस स्टेशन यांच्या वतीने कायदेविषयक महिला व मुलींना कार्यशाळेचे आयोजन दि.13/01/2024 रोजी पांगरी या गावांमध्ये करण्यात आले होते या कार्यक्रमाला वकील संघाचे अध्यक्ष अशोक दादा तायडे यांनी महिलांना मार्गदर्शनामध्ये सांगण्यात आले की आपण कुठल्याही प्रकारचा अन्याय अत्याचार सहन करायचा नाही व एडवोकेट शेख उस्मान यांनी सांगितले आपले घरगुती भांडण आपण गावामध्येच मिटवले पाहिजे कोर्टाची पायरी चढली नाही पाहिजे एडवोकेट रूपाली जाधव मुलींना मार्गदर्शन केले की कोणी आपल्याकडे एक मिनिटापेक्षा जास्त जर बघत असेल तर आपण ते आपल्या आई-वडिलांपासून इतरांपासून लपवलं नाही पाहिजे इतरांचा स्पर्श चांगला आहे की वाईट आहे हे मुलीने समजून घ्यावे सामाजिक कार्यकर्ते के के जगताप यांनी सांगितले आपले भांडण आपण आपले गावांमध्येच मिटवले पाहिजे आपले भांडण गावांमध्ये मिटले नाही तर आपण महिला समादेशक केंद्र यांच्याशी संपर्क करूव समता दूत पार्टी उमाकांत बोर्डे यांनी मुलींच्या शिक्षणाविषयी अत्यंत महत्त्वाचे सखोल अशी माहिती दिली समता दूत मनोहर अपार राज अहिरे आकाश जाधव सिल्लोड शहर पोलीस स्टेशन महिला समुपदेशन केंद्र समुपदेशक आरती जाधव समुपदेशक विशाल अर्जुन पाईकराव यांनी महिला समुपदेशन केंद्रामध्ये आपण पीडित महिला असाल तर आपण अर्ज करू शकता असे आव्हान केले व समारोप सरपंच दत्तू शिंदे यांनी केला व या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला मुली व गावातील प्रतिष्ठित व्यक्ती यांची उपस्थिती होती.

# भाजपाचे मंत्री नारायण राणे यांच्या निषेधार्थ तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

यासीन शेख

**लोणार :** दि. 15 जानेवारी रोजी लोणारचे तहसीलदार गिरीश जोशी यांना लोणार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेश मापारी व शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख समद शेख अहमद यांच्या नेतृत्वात भाजपचे मंत्री नारायण राणे यांनी हिंदु धर्माचे सर्वोच्च आचार्य शंकराचार्य यांचा अपमान केल्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नानाभाऊ यांच्या आदेशानुसार व बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुल बोंद्रे यांच्या निर्देशानुसार लोणार तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने निषेध आंदोलन करून तहसीलदार यांना निवेदन दिले. भाजपा नेते व केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी हिंदु धर्माचे सर्वोच्च आचार्य शंकरराचार्य यांचे योगदान काय? असा प्रश्न



विचारून शंकराचार्य व तमाम हिंदुचा अपमान केला आहे. काँग्रेस पक्ष शंकराचार्य यांचा अपमान सहन करणार नाही.

भाजप नेते केंद्रीय मंत्री नारायण राणे वर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, अन्यथा लोणार तालुका काँग्रेस कमेटी च्या वतीने जनआंदोलन करण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी महाराष्ट्र शासनाची राहील.असे निवेदन देण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष राजेश मापारी, शहराध्यक्ष शेख समद शेख अहमद,काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रकाश भाऊ धुमाळ, माजी पंचायत समिती ज्ञानेश्वर चिभडे, नगरसेवक संतोष मापारी, नगरसेवक शेख रऊफ शेख महबूब, ओबीसी सेल शहराध्यक्ष अंबादास इंगळे, माजी नगरसेवक प्राध्यापक सुदन कांबळे, शहर काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष रामचंद्र कोचर, युवक काँग्रेस शहराध्यक्ष विकास मोरे,नगराध्यक्ष मनीष पाटोळे,माजी नगरसेवक शंकर हेंद्रे,माजी नगरसेवक शेख असलम शेख कासम, आप्पा शिंदे, शुभम चाटे, केतन बाजड उपस्थित होते.



# सी. एस. एम. एस. एस. कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकमध्ये के-स्कीम अभ्यासक्रमावर विभागीय कार्यशाळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबईतर्फे राबविल्या जाणाऱ्या विविध अभ्यासक्रमांच्या सुधारित के स्कीमवर छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या कॉलेज ऑफ पॉलिटेक्निकमध्ये विभागातील द्वितीय सत्र शिकवणाऱ्या स्टाफ व शैक्षणिक समन्वयक यांच्यासाठी विभागीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ विभागीय उपसचिव श्री. अक्षय जोशी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल टीचर्स ट्रेनिंग अँड रिसर्च, भोपाळ विभागप्रमुख डॉ. अंजू रावले, डॉ. निषित दुबे तसेच एम. एस. बी. टी. ई.चे तज्ज्ञ प्रा. आर. टी. आघाव, तंत्र शिक्षण विभागीय सहाय्यक सचिव श्री. परमेश्वर सोळंकी, कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेसाठी छत्रपती संभाजीनगर विभागातील विविध संस्थांमधील 200 हून अधिक स्टाफनी सहभाग नोंदवला.

कार्यशाळेचे प्रास्ताविक श्री. अक्षय जोशी यांनी करून कार्यशाळेचा उद्देश समजावून सांगितला. कॉलेज ऑफ पॉलीटेक्निक प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. याप्रसंगी बोलताना प्रा.आर.टी. आघाव यांनी सुधारित अभ्यासक्रमाबद्दल सविस्तर माहिती सांगितली. त्याचप्रमाणे डॉ. अंजू रावले यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -2020 अंतर्गत विविध अभ्यासक्रमामध्ये करण्यात आलेली बदल, त्याचप्रमाणे आउट कम बेस्ड एज्युकेशन देण्यासाठी विविध मार्गदर्शक सूचना व त्याचा अभ्यासक्रमामध्ये अंतर्भाव करून विद्यार्थ्यांना सामाजिक नैतिक मूल्य यांची जोपासना करण्यासाठी तसेच एक सुजाण नागरिक बनवण्यासाठी विविध कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे. कोणताही अभ्यासक्रम शिकवत असताना तो समाजाच्या तसेच विविध उद्योगामधील गरजा लक्षात घेऊन कौशल्य संपन्न मनुष्यबळ पुरवण्यासाठी पदविका अभ्यासक्रम अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतो असे मत व्यक्त केले.

डॉ. निषित दुबे यांनी क्युरियोसीटी, इनोव्हेटिव्ह तसेच इंटरेस्टिंग अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना शिकवून त्यांना त्यांचे कौशल्य वाढीस लागण्यासाठी आपण एक शिक्षक म्हणून काम केले पाहिजे. केवळ अभ्यासक्रम न शिकवता त्या विद्यार्थ्याला अनुभवातून किंवा प्रयोगातून एखादी संकल्पना स्वतः शिकण्यासाठी प्रवर्त करणे हे के-स्कीम अभ्यासक्रमाचे मुख्य ध्येय असल्याचे मत व्यक्त केले. द्वितीय सत्रामध्ये नवीन सुधारित अभ्यासक्रमातील के-स्कीम मधील सोशल अँड लाइफ स्किल या विषयाच्या विविध मार्गदर्शक सूचनेनुसार वेगवेगळे मॉडेल्स तयार करण्यात आले असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020 नुसार विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्य तसेच सामाजिक नैतिक मूल्य यांची जोपासना करण्यासाठी सदरील मॉडेल्सचा फायदा होणार आहे. यामध्ये उन्नत महाराष्ट्र अभियान, नॅशनल सर्व्हिस स्कीम (राष्ट्रीय सेवा योजना), युनिव्हर्सल ह्यूमन व्हॅल्यू, व्हॅल्यू एज्युकेशन (उन्नती फाउंडेशन), फायनान्शियल लिटरसी (आर्थिक साक्षरता) अशा विविध उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्यांची जोपासना करण्याचा मंडळाचा मानस आहे. छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजित मुळे, सचिव श्री. पद्माकरराव मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे शुभेच्छा दिल्यात. आभार प्रदर्शन श्री.परमेश्वर सोळंकी यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. कैलास तिडके यांनी केले.



## वक्तृत्वशैलीने व्यक्तिमत्व बहरते : पोले

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे आयोजन कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय जिंतूर येथे करण्यात आले होते. राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीदिनी आयोजित केलेल्या या भव्य तालुकास्तरीय स्पर्धेचे प्रास्ताविक करताना गटशिक्षणाधिकारी त्रंबक पोले बोलत होते. 01 जानेवारी 2024 पासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सन्माननीय मुख्यमंत्री महोदय यांचे महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभियान सुरू झाले आहे. या अभियानातील विविध उपक्रमातील एक भाग असणारी वक्तृत्व व निबंध स्पर्धा तालुकास्तरावर उच्च प्राथमिक व माध्यमिक अशा दोन गटात आयोजित केली होती. प्रत्येक व्यक्तीच्या अभिव्यक्ती कौशल्याला वाव देणाऱ्या या दोन्ही स्पर्धा आहेत. आपल्या मनातील विचार, भावना यांची शैलीबद्ध पद्धतीने मांडणी करून ऐकणाऱ्या श्रोत्यांना प्रभावित करणे म्हणजे वक्तृत्व. वक्तृत्व कलेमुळे माणसाचे व्यक्तिमत्व खऱ्या अर्थाने बहरते. निबंध स्पर्धेत भाग घेताना व स्पर्धेतील विषयावर लिहिताना आपल्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो. आपली विचार करण्याच्या प्रक्रियेला चालना मिळते. यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होतो यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धेसाठी वक्तृत्व कलेत तज्ञ असणारे विनोद पाचपिल्ले, कल्याण भोसले हे परीक्षक होते. तर निबंध स्पर्धेसाठी या तज्ञ असणारे शिवाजी वाघ, जयश्री लहाने, भगस हे परीक्षक होते. वक्तृत्व स्पर्धेत माध्यमिक गटात शिल्पा दिलीप चव्हाण हिने प्रथम तर ऋतुजा गजानन नागरे हिने द्वितीय क्रमांक मिळवला. उच्च प्राथमिक गटात वेदिका गोविंद पितळे, श्रावणी हनुमान गरड यांनी विभागून प्रथम, भक्ती नारायणराव खापरे हीने द्वितीय, गायत्री माधवराव कुकडे हिने तृतीय क्रमांक मिळवला. या स्पर्धेमध्ये स्वरा गोविंद कांदे या इयत्ता चौथीत शिकणाऱ्या चिमुकलीने उस्फूर्तपणे वक्तृत्व स्पर्धेत भाग घेऊन उपस्थित सर्वांना मंत्रमुग्ध केले. याबद्दल या बाल चिमुकलीचा गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले यांनी गौरव केला. निबंध स्पर्धेचा निकाल प्रक्रियेमध्ये आहे.

या भव्य तालुकास्तरीय स्पर्धांचे सूत्रसंचालन साहित्यिक मयूर जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी ज्ञानोबा साबळे व मंगेश नरवाडे, केंद्रप्रमुख मारोती घुगे, पांडुरंग भांबळे, शंकर चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैजनाथ प्रधान, डी जी पोले, रामेश्वर कांदे, मनीष सावळे, रवी मुंडे, सुरेश सोळंके, प्रभाकर नालंदे, सचिन चव्हाण, योगेश देशमुख, योगिता संगवई, रत्नमाला तोडकर यांनी मेहनत घेतली.

## मत्स्योदरी महाविद्यालय अंबड येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाविषयी जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** विद्यापीठ विकास मंच डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि मत्स्योदरी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने मत्स्योदरी महाविद्यालयाच्या विज्ञानभवन, कॉन्फरन्स हॉलमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- 2020 संदर्भात जनजागृती करण्यासाठी , या नविन धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बारावी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक बदल आणि त्याचे सकारात्मक परिणाम आदीबाबत माहिती देण्यासाठी या सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.

NEP- 2020 जनजागृती सेमिनारसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुणे येथील शिक्षणतज्ञ तथा विद्यापीठ विकास मंच महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रा एन डी पाटील हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य शहाजीराव गायकवाड होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून मराठी अभ्यास मंडळ अध्यक्ष तथा विद्यापीठ विकास मंच डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे निमंत्रक प्रा डॉ सर्जेराव जिगे व राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य तथा अभाविप देवगिरी प्रदेश उपाध्यक्ष प्रा नाना गोडबोले हे होते. व्यासपीठावरती उपप्राचार्य प्रा उबाळे सर, पर्यवेक्षक प्रा संजय काळे, प्रा. पोपटराव सुरासे, प्रा डॉ पाथरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणतज्ञ प्रा एन डी पाटील सर यांनी सोप्या भाषेत व पुणेरी शैलीत विनोद करत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समजावले . ते म्हणाले," NEP -2020 ची अंमलबजावणी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील पदव्युत्तर विभागांमध्ये व महाराष्ट्रातील 87 स्वायत्त महाविद्यालयांमध्ये यावर्षी झाली आहे. पुढील वर्षी मेडिकल व लॉ शिक्षण वगळता सर्व पदवीच्या प्रथम वर्ष प्रवेशापासून या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होणार आहे. म्हणजे या वर्षी बारावी उत्तीर्ण विद्यार्थी हे खऱ्या अर्थाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे वाहक असतील. त्यामुळे त्यांनी 34 वर्षानंतर आलेले हे धोरण समजून घेतले पाहिजे. पदवीच्या प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांस मेजर व मायनर या गटातून विषय निवडीचे स्वातंत्र्य असेल. त्याचबरोबर प्रथम वर्षामध्ये बहुपर्यायी भारतीय ज्ञान परंपरा आधारित श्रेयांक अभ्यासक्रम बंधनकारक असेल. आता महाविद्यालयात शिक्षण हे अंतरविद्याशाखीय झाले आहे. त्यामुळे विद्यार्थी आता आपल्या करिअरसाठी मुख्य विषयाच्या गटासह इतर आवडीचे विषय अभ्यासासाठी निवडू शकतील. अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट या नावीन्यपूर्ण आभासी खात्यामध्ये त्यांचे सर्व श्रेयांक म्हणजेच क्रेडिट साठवले जातील. प्रत्येक विद्यार्थ्यास हे अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट ऑनलाईन खाते उघडणे बंधनकारक असेल. त्यामुळे त्याच्या शैक्षणिक गुणवत्तेचे जतन यामध्ये केले जाईल. मल्टिपल इंट्री- मल्टिपल एक्झिट या सुविधे अंतर्गत विद्यार्थी सात वर्षाच्या आत केव्हाही पदवी प्राप्त करू शकतो व गॅप सुद्धा घेऊ शकतो. मातृभाषेला महत्त्व देताना इतर ज्ञानभाषेचे महत्त्व कमी होणार नाही. याची काळजी घेताना पोर्टलचा आधार घेऊन प्रत्येक विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये भाषांतर विभाग असेल.



## सावळदबारा येथे गावांतर्गत ड्रेनेज लाईन व सिमेंट रोड कामांना सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे "आमचा गाव आमचा विकास" योजनेंतर्गत गावातील ड्रेनेज लाईन व सिमेंट रोड या कामांना शुभारंभ युवा नेते तथा उपनगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्या हस्ते करण्यात आला, यासाठी सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे हे खऱ्या अर्थाने विकासाला चालना देणारे सरपंच आहेत.सरपंच पती व कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी



सभापती शिवाआप्पा चोपडे यांनी अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांच्या माध्यमातून गावामध्ये ड्रेनेज लाईन, पेव्हर ब्लॉक व विविध कामांचा वेळोवेळी पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेतला आणि करोडो रुपयांचा कृती आराखडा मंजूर करून घेतला आहे. त्यातून सावळदबारा गावात विकास कामांना ग्रामपंचायत प्रशासनाने सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे, उपसरपंच मो आरिफ मो लुखमान व ग्रामपंचायत सदस्य यांनी सुरुवात केली आहे. याप्रसंगी सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे उपसरपंच मो आरिफ मो लुखमान ग्रामपंचायत सदस्य मोहन सुरडकर, माजी सरपंच मो लुखमान मो शरीफ, चेअरमन दिनकरराव देशमुख, मा. सरपंच किसन सूर्यवंशी पंजाबराव देशमुख, माजी सरपंच मेहताप तडवी ग्रामपंचायत संदीप सूर्यवंशी सोसायटी संचालक अनिल पाटील पंढरी सपाटे, विठ्ठल आप्पा काळे, सोसायटी संचालक विजय कुल्ले, ग्रामसेवक सुधीर भालेराव माजी सरपंच ईश्वर कोळपे गणेश खैरे फिरोज खान सय्यद मुनाफ भीमा शेळके,आदी गावकरी यांची उपस्थिती होती.

# चंद्रपूरमधून महायुतीच्या महाप्रवाहाचा एल्गार होऊ द्या

## सुधीर मुनगंटीवार : चंद्रपूरमध्ये महायुतीचा जिल्हास्तरीय कार्यकर्ता मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महायुतीच्या संमेलनात भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आरपीआय हे चारही पक्ष एकत्र आले आहेत. आपण सारे केवळ भाषण देण्यासाठी नव्हे तर महायुतीच्या महाप्रवाहाचा एल्गार करण्यासाठी एकत्र आलो आहोत. आपल्या एकजुटीचा आदर्श महाराष्ट्रात निर्माण करण्याचा निर्धार करण्यासाठी एकत्र आलोय. आमदार, खासदार, मंत्री कुणीही झाले तरीही छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र अध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्टीने पुढे गेला पाहिजे, हा उद्देश ठेवून पुढे मार्गक्रमण करावे, असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी येथे केले.

चंद्रपूर जिल्ह्यातील महायुतीचा जिल्हास्तरीय कार्यकर्ता मेळावा रविवारी आयोजित करण्यात आला. यावेळी ना. श्री. मुनगंटीवार बोलत होते. या कार्यक्रमाला राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, भाजपचे जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महानगर जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, लोकसभा



निवडणुक प्रमुख प्रमोद कडू, महायुती समन्वय प्रमुख देवराव भोंगळे, शिवसेना जिल्हाध्यक्ष बंडू हजारे, शिवसेना जिल्हाध्यक्ष नितीन मत्ते, राष्ट्रवादी काँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष राजीव कक्कड, आरपीआय (आठवले गट) जिल्हाध्यक्ष गौतम तोडे, आरपीआय (आठवले गट) ग्रामीण अध्यक्ष जयप्रकाश कांबळे, पिपल्स रिपब्लिकन पार्टीचे हरी दुर्योधन, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सचिव आबिद अली, भाजपचे ज्येष्ठ नेते चंदनसिंग चंदेल, ब्रह्मपुरी विधानसभा प्रमुख अतुल देशकर, वरोरा विधानसभा प्रमुख रमेश राजूरकर, लोकसभा विस्तारक रवी बेलूरकर, भाजप नेते अशोक जिवतोडे, माजी महानगर जिल्हाध्यक्ष मंगेश गुलवाडे, भाजप नेते रामपाल सिंग, माजी महापौर राखीताई कंचर्लावार, माजी जिल्हापरिषद अध्यक्ष संध्याताई गुरनुले, माजी आमदार संजय धोटे, सुदर्शन निमकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

**राहुल गांधी आले तरीही :** काँग्रेसचे लोक किंवा इतर विरोधी राजकीय पक्षांचे जेवढे लोक शिल्लक आहेत, त्यांच्याविरोधात एकजुटीने लढण्याची गरज आहे. ही एकजूटता दाखवली तर राहुल गांधी चंद्रपूरमध्ये मुक्काम करून बसले तरीही काँग्रेसला जागा जिंकता येणार नाही, असे ना. श्री. मुनगंटीवार म्हणाले. राहुल गांधी जेथे जातात तेथे काँग्रेसचा उमेदवार पराभूत होतो, ही बाब लक्षात ठेवण्याचे आवाहनही त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

**हमारा बुथ सबसे मजबुत :** महायुतीमध्ये प्रत्येक पक्ष वेगळ्या विचारांचा आहे, पण दिशा एकच आहे. त्यामुळे एखाद्या प्रसंगाला एकमेकांचा राग आला तरीही तो महायुतीवर किंवा आपल्या पक्षावर काढायचा नाही, असा निर्धार करा. आपल्याला एकत्र येऊन समन्वय ठेवायचा आहे. 'हमारा बुथ सबसे मजबुत' हा भाव ठेवून काम करा. त्यासाठी जिल्ह्यामध्ये पक्षप्रवेश वाढविण्याची गरज आहे. आपला पक्ष आणि महायुती मर्यादित ठेवू नका. प्रत्येकाने विकासाची गाडी धावत राहील यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन देखील त्यांनी केले.

मुनगंटीवार म्हणाले, 'महाराष्ट्रात शिंदेंचा एस, फडणविसांचा एफ, पवारांचा पी म्हणजे सुपर फास्ट प्रोग्रेस काम करत आहे. आपण महाराष्ट्राचा विकास व्हावा म्हणून एकत्र आलोय. महायुतीमधील प्रत्येक पक्षाच्या नेत्यांनी आज एका वैचारिक भावनेतून एक स्वर, एक लक्ष्य अशी भूमिका मांडली. आपण विविध पक्षांचे असलो तरीही हीच भूमिका घेऊन आपल्याला पुढे जायचे आहे.' समन्वय समितीचे महत्त्व सांगताना ते म्हणाले, 'महाराष्ट्राच्या समन्वय समितीचा मी देखील सदस्य आहे. समितीच्या बैठकीत मी जिल्हास्तरीय एकत्रीकरणासाठी आग्रही होतो. आज महाराष्ट्रात एकाच दिवशी महायुती एकत्र येत आहे, याचा आनंद होत आहे. एक सूर, एक लक्ष्य आणि एक दिशा हा भाव ठेवावा लागेल. त्यासाठी जिल्हास्तरीय समन्वय समिती नेमण्याची गरज आहे. यासोबतच युवकांची आणि महिलांचीही समन्वय समिती स्वतंत्र असायला हवी. विधानसभानिहाय एकरुपता यावी म्हणून ६ विधानसभांच्या तारखा निश्चित करून नियोजन आवश्यक आहे.' चंद्रपूरमध्ये महायुतीच्या वतीने महिलांना एकत्र करून मकरसंक्रांतीचा उत्सव साजरा करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

महायुतीला महाराष्ट्रातील लोकसभेच्या सर्व जागा जिंकायच्या आहेत. विरोधी पक्षाकडे कुठलाही विचार नाही आणि विकासाचा जाहीरनामा नाही. सोशल मीडियावरील त्यांच्या विषारी प्रचाराला सत्यावर आधारित उत्तर देण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, असेही ना. श्री. मुनगंटीवार म्हणाले.

केंद्र व राज्य सरकारच्या विकासाच्या अनेक योजना आहेत. राज्यातील असो वा जिल्ह्यातील योजना असो, त्या लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आपल्याला करायचा आहे, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.



# महात्मा फुले समाजकार्य महाविद्यालयात नामविस्तार दिनानिमित्त कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** महात्मा ज्योतिबा फुले समाज कार्य महाविद्यालय जालना राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने आयोजित डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनाच्या कार्यक्रमात प्रा. डॉ. रेणुका बडवणे आणि प्रा डॉ नरसींग पवार यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ सर्जेराव कहाळे यांनी केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ प्रशांत कुमार वनंजे यांनी नामांतर लढ्यातील संघर्षपूर्ण ईतिहास विशद केला.

याप्रसंगी प्रा डॉ. राहुल हिवराळे, रमेश खरात बबनराव राठोड कैलास कुरंगळ ज्ञानेश्वर मदन ईश्वर शिंदे वाल्मिक वाघ गणपत मेहेत्रे प्रदीप भालमोडे अशोक राठोड अंगद शिंदे, रविंद्र झोटे, राजु गरूड, माणिक खरात, ज्योती महागडे, सर्व स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थीनी ऊपस्थीत होते.

# हंसराज अहीर यांनी राबविली हिंग्लाज भवानी मंदिरात स्वच्छता मोहीम

## भाजप कार्यकर्ते व नागरिकांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** दि. 22 जानेवारी रोजी अयोध्येत प्रभु श्रीरामचंद्रांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा होत असून या महासोहळ्याच्या पार्श्वभुमीवर देशभरातील सर्व मंदीरांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्याचे आवाहन प्रधानमंत्री माननिय नरेंद्र मोदी जी यांनी केले असल्याने दि. 14 जानेवारी रोजी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी चंद्रपूर शहरातील बाबुपेठ येथील माता हिंग्लाज भवानी मंदीरात मातेचे दर्शन व पुजा अर्चना करुन मंदीर परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. या स्वच्छता मोहीमेमध्ये या परिसरातील माजी नगरसेवक प्रदीप किरमे, माजी नगरसेविका कल्पनाताई बगुलकर, पंडीत मथुराप्रसाद पांडे, दशरथ सोनकुसरे, बाथोताई, रेखाताई चन्ने, संजय मिसलवार, आकाश पिसे, सुदामा यादव, पडवेकर ताई, मंदीराचे पुजारी संतोष जाधव, शालुताई कन्नोजवार, रेखाताई पाटील, पार्वताबाई आंबिलकर, वंदना कंदीकुरवार, वासंती मेडसिंगे, मिना पारपल्लीवार, इंगोले ताई, सावरकर ताई, नंदुरकर ताई व परिसरातील शेकडो नागरिक या स्वच्छता मोहीमेत सहभागी झाले होते. यावेळी हंसराज अहीर यांनी उपस्थितांना तसेच शहारातील विविध मंदीर परिसरात नागरिकांनी स्वयंस्फुर्तीने स्वच्छता मोहीम राबवावी असे आवाहन केले.





# कृषि प्रदर्शनास शेतकरी गटाच्या भेटी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** धकाधकीच्या व धावपळीच्या जीवनात अयोग्य व अवेळी खानपान तसेच वाढलेली रोगराई यासाठी रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी फळे, भाजीपाला तसेच धान्याच्या गावराण वाणांचा समावेश आहारात केल्यास बऱ्याच प्रकारच्या रोगांना अटकाव येतो व रोगप्रतिकार शक्ती वाढते. याकरीता जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी छत्रपती संभाजीनगर देशमुख व प्रकल्प संचालक आत्मा छत्रपती संभाजीनगर बी एस तौर व प्रकल्प उपसंचालक आत्मा छत्रपती संभाजीनगर अनिल कुलकर्णी यांनी ॲग्रोवन व कृषि विभाग यांच्या संयुक्तीकपणे जिल्हा स्तरीय फळे व भाजीपाला महोत्सव प्रदर्शनाचे आयोजन ११ ते १४ जानेवारी या कालावधीत केलेले होते. सदारच्या प्रदर्शन भेटीसाठी सोयगांव तालुक्यातून ८५ शेतकरी कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा कृषि विभाग यांचा माध्यमातून दिनांक १४ जानेवारी २०२४ रोजी गेले होते यात प्रामुख्याने आत्मा योजनेअंतर्गत स्थापन झालेले गटातील शेतकरी कृषि कन्या शेतकरी गट जंगलातांडा – २५ शेतकरी, बळीराजा शेतकरी बचत गट सोयगांव – १० शेतकरी, कृषि क्रांती शेतकरी गट सावरखेडा – २५ शेतकरी, श्री सर्वज्ञ कृषि गट नायगांव – १५ शेतकरी व बळीराजा शेतकरी समूह फर्दापुर – १० शेतकरी यांचा समावेश होता. सदरील प्रशिक्षणासाठी चार दिवस धान्य, महिला बचत गटातील पदार्थ तसेच कृषि प्रक्रिया केलेले पदार्थ यांची विक्री करण्यासाठी कृषि विभाग यांनी प्रती तालुका चार स्टॉल विनामूल्य उपलब्ध करून दिलेले होते सदारच्या स्टॉल मध्ये सोयगांव तालुक्यातून तुळजाई महिला बचत गट बनोटी व घोसला नैसर्गिक शेती उत्पादक गट घोसला यांनी आपला शेतमाल विक्रीसाठी ठेवला होता. तसेच प्रदर्शनादरम्यान शेतकरी यांचे शेतमाल नमुने माहितीसह जिल्ह्याच्या स्टॉल मध्ये मांडण्यात आलेले होते सदरील शेतमाल नमुने प्रदर्शन स्थळापर्यंत तालुका कृषि अधिकारी मदन शिसोदिया, मंडळ कृषि अधिकारी संपत वाघ व रमेश गुंडिले यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित गावचे कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक यांनी वेळेवर पोहोच करून प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले. तसेच आत्मा अंतर्गत कृषि बचत गट व सदस्य यांना प्रदर्शन स्थळी येण्यासाठी आवश्यक नियोजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सोयगांव अमोल महाजन यांनी केले.

# जामनेर येथील प्रा. सुमित काबरे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** शिक्षण विभाग जिल्हा परिषद जळगाव आयोजित ५१ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनचे आयोजन ज्ञानगंगा माध्यमिक विद्यालय येथे दि.१२ ते १३ जाने.२०२४ दरम्यान नुकताच संपन्न झाला. शेवटच्या दिवशी बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी जामनेर शहराच्या नगराध्यक्ष सौ. साधनाताई महाजन यांच्या शुभहस्ते परीक्षक प्रमाणपत्र, बुके जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात उत्कृष्टरित्या परीक्षक म्हणून काम पाहिल्याबद्दल इंदिराबाई ललवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे जीवशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सुमित काबरे यांचा यथोचित सत्कार करुन त्यांना गौरविण्यात आले.प्राचार्य, प्राध्यापक, मान्यवर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते अशी माहिती प्रा.समीर घोडेस्वार यांनी बोलताना सांगितले.



# तीर्थक्षेत्र लोणी बुद्रुक अनेक समस्यांच्या विळख्यात

## प्रशासनाचे दुर्लक्ष आणि लोकप्रतिनिधींचा काना डोळ्याने तीर्थक्षेत्र दुर्लक्षित

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेले तीर्थक्षेत्र लोणी बु. हे गाव अनेक सुविधांच्या बाबतीत आजही उपेक्षितच राहिले आहे. गावाअंतर्गत असलेल्या रस्त्यांची दुरावस्था झाली असून, सांडपाण्याचे कुठलेही नियोजन नसल्यामुळे ग्रामस्थ घाणीच्या विळख्यात सापडले आहेत. जिल्हा परिषदेच्या प्रशासनाचे दुर्लक्ष आणि आमदार, खासदार यांच्या सारख्या बड्या लोकप्रतिनिधींचा जाणीवपूर्वक कानाडोळा होत असल्याने गावाचा विकास खुंटला असल्याचे येथील ग्रामस्थ बोलत आहेत. सर्वत्र पसरलेल्या घाणीमुळे गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची खंत ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. या गंभीर बाबीकडे संबंधीत प्रशासनाने व लोकप्रतिनिधिंनी लक्ष द्यावे अशी मागणी जोर धरत आहे. संत सखाराम महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या लोणी बु. येथे जिल्हयातीलच नव्हे; किंबहूना विदर्भातील सर्वात मोठी यात्रा भरते. त्यामुळे हे गाव विदर्भ, मराठवाड्यातील नामांकित तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. तालुक्याचे शेवटचे टोक आणि रिसोड विधानसभा व अकोला लोकसभा मतदारसंघातील हे अखेरचे गाव आहे. त्यामुळे आसपासच्या दहा ते पंधरा गावांची बाजारपेठ सुद्धा आहे.त्यामुळे बाहेरगावच्या नागरिकांची सुद्धा तेथे नेहमी वर्दळ असते. शिवाय येथे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय असून स्थानिक व बाहेरगावच्या विध्याध्यांची संख्या लक्षणीय आहे. एकंदरीत नेहमी नागरिकांची व विद्यार्थ्यांची वर्दळ असलेल्या या गावातील घाणीच्या साम्राज्याने सर्वांचेच आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत स्थानिक ग्राम पंचायतशी संपर्क साधला असता अपुऱ्या शासकिय निधीमुळे गावातील विकास कामे खोळंबली असल्याचे कळले आहे. तसेच तत्कालीन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जवळपास विस कोटी रुपये एवढा निधी तीर्थक्षेत्र विकास आराखड्या साठी मंजूर ही केला होता त्यातील पहिल्या टप्प्यातील काही कामे झाली परंतु त्यामधे गुणवत्ता नाही. तसेच बरीचशी कामे ही अद्यापही स्थानिक मोठ्या लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे प्रलंबित आहेत. स्थानिक आमदार हे त्या समितीचे सदस्य आहेत. तरी सुद्धा अशी स्थिती झाली आहे. मात्र अनास्थेमुळे सार्वजनिक शौचालय, दोन युनिटे,तसेच सुसज्ज बसस्थानक, मंदिर मार्गापर्यंत सिमेंट रस्ता व स्ट्रीट लाइट,ही पहिल्या टप्प्यातील कामेच प्रलंबित असल्याने दुसऱ्या टप्प्यातील दहा कोटिंची कामे कशी मार्गी लागणार असा ? प्रश्न स्थानिक नागरिकांना पडला आहे.

**संबंधित प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष :** ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने केन्द्र व राज्य शासन विविध योजना राबवित आहे . मात्र केवळ नियोजना अभावी सदर योजना केवळ कागदावरच पडून आहेत . परिणामी आजही ग्रामीण भागातील पाणी, दिवाबत्ती, रस्ते, प्रदूषण, आरोग्य आदी समस्या जैसे थे स्थितीत असल्याचे लोणी बु . येथील उदाहरण पुरेसे आहे . मात्र याकडे संबंधीत प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे .





लोणी बु .हे जिल्ह्यातील एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे . तालुक्याच्या शेवटचे टोक असल्याने आसपासच्या दहा ते पंधरा गावांची बाजारपेठ आहे . एव्हढे मोठे केंद्रस्थान असून सुद्धा येथील रस्ते, नाल्या, विद्युत पुरवठा अशा अनेक समस्या "आ" वासून उभ्या आहेत . ग्राम पंचायत स्तरावरील निधी कमी पडत असून, काही किचकट निकषांमुळे बऱ्याच समस्या लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे प्रलंबित आहेत . आमदार, खासदार याबाबत अनभिज्ञ असल्याने लोकांना त्रास सहन करावा लागत आहे . याकडे संबंधीतांनी लक्ष द्यावे अशी अपेक्षा आहे . . !"

**प्रिया चौगुले , ( सरपंच,लोणी बु . ता .रिसोड )**



गावातील वार्ड क्र .तीनसह, संपूर्ण गावातील प्रामुख्याने दलीत वस्ती,झोपडपट्टी, नवीन वाढीव वस्ती, यामधील नाल्यांचा प्रश्न नेहमीच भेडसावत आहे . तसेच ग्राम स्तरावर बंधीत, अबंधित असे वर्गीकरण असल्याने खर्चास मर्यादा आहेत . त्यासाठी भरपुर निधि उपलब्ध करून देण्यासाठी आमदार, खासदार यांनी मदत करायला पाहिजे आणि प्रशासनाने लक्ष द्यावे अशी गावकऱ्यांच्या वतीने माझी मागणी आहे . . !"

**गीताबाई उद्धवराव बोडखे, ( ग्रा . पं . सदस्य, लोणी बु . ता . रिसोड)**

# संशोधक विद्यार्थ्यांची आरआरसी त्वरीत घ्या व पुढील प्रक्रिया गतिमान करा

## प्रा. नीलेश बेलखेडे : अन्यथा धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** जवळपास एक वर्षे होत आले आहे मात्र गोंडवाना विद्यापीठ, पी.एचडी. विभागात ज्या संशोधक विद्यार्थ्यांनी त्यांचे शोधप्रबंध सबमिट केलेले आहेत, त्यांची RRC अद्याप लागलेली नाही. विद्यापीठात शोधप्रबंध सबमिट करून देखील पुढील प्रक्रियेसाठी त्यांना तात्काळत बसावे लागत आहे. त्यामुळे शोधप्रबंध सादर केलेल्या संशोधक विद्यार्थ्यांची RRC त्वरीत घ्या व पुढील प्रक्रिया गतिमान करा; अन्यथा विद्यापीठात धरणे आंदोलन करू, असा इशारा गोंडवाना विद्यापीठाचे सिनेट सदस्य तथा युवा सेनेचे (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पूर्व विदर्भ सचिव प्रा. निलेश बेलखेडे यांनी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोखारे यांना एका निवेदनातून दिला आहे. प्राप्त माहितीनुसार जवळपास १०० हुन अधिक संशोधक विद्यार्थी आहेत की ज्यांनी विद्यापीठातील पी.एचडी. विभागात शोधप्रबंध सादर केलेले आहे. आधीच संशोधक विद्यार्थी हा तीन ते चार वर्षे शोधकार्यात घालवितो. त्यानंतर शोधप्रबंध सबमिट केल्यानंतर देखील RRC, शोधप्रबंध एक्स्पर्ट कडे पाठविणे, अभिप्राय मागविणे, अंतिम व्हायवा आदी प्रक्रियेत बराच कालावधी जातो. विद्यापीठात शोधप्रबंध सबमिट केल्यानंतर सहा महिन्याहुन अधिक काळ हा पी.एचडी. अवॉर्ड नोटीफिकेशन निघण्याकरीता लागतो. या प्रक्रियेत गतिमानता नाही. परिणामी संशोधक विद्यार्थ्याला पी.एचडी. अवॉर्ड होण्यास वेळ लागतो. त्यामुळे त्यांच्या नोकरीच्या संधी हिरावल्या जातात व संशोधक विद्यार्थी हा महाविद्यालयात नोकरीस असल्यास त्याला मिळणारे प्लेसमेंट व इनक्रिमेंट ला विलंब होतो. या सर्व बाबींचा अत्यंत गांभीर्याने विद्यापीठ व फॅकल्टी हेड यांनी विचार करायला हवा, असे निवेदनात म्हटले आहे. व विद्यापीठात शोधप्रबंध सबमिट झाल्यानंतरची प्रक्रिया गतिमान करावी, अशी मागणी आहे.

सदर कार्यप्रणाली गतीमान न केल्यास व लांबलेली RRC ची तारीख त्वरीत जाहीर न केल्यास, सर्व संशोधक विद्यार्थ्यांना घेवून विद्यापीठात धरणे आंदोलन करू, व होणाऱ्या त्रासास आपण स्वत: जवाबदार असाल, असा निर्वाणीचा इशारा प्रा . निलेश बेलखेडे यांनी कुलगुरूंना दिलेल्या निवेदनातून दिला आहे .
याबाबत गोंडवाना विद्यापीठाचे प्र–कुलगूरू, प्र–सचिव परिक्षा नियंत्रक अधिकारी, यांना सुध्दा प्रतिलिपी देण्यात आल्या आहेत .

# दुष्काळग्रस्त भागात महसूल विभागाने करवसुली थांबवावी : वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील दुष्काळग्रस्त गावांमध्ये महसूल विभागाकडून करवसुली सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. महसूलमंत्र्यांच्या जिल्ह्यात हा प्रकार घडत असल्याने शेतकऱ्यांनी न्याय मागायचा कोणाकडे, असा प्रश्न शेतकरी विचारत आहेत. सरकार एकीकडे दावोसवर 34 कोटींची उधळण करत आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांकडून वसुली सुरु आहे. यामुळे हे सरकार शेतकरी विरोधी असल्याचे वारंवार सिद्ध होत आहे. अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारचे वाभाडे काढले आहेत. त्याचबरोबर दुष्काळग्रस्त भागात महसूल विभागाने करवसुली तात्काळ थांबवावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी सरकारकडे केली आहे. वडेट्टीवार म्हणाले की, लेखी आदेश वेगळे आणि तोंडी आदेश वेगळे असा खेळ या सरकारने मांडला आहे. सरकार शेतकऱ्यांची दिशाभूल करत आहे. दुष्काळग्रस्त भागात सरकारी वसुली, वीजबिल वसुली, कर्जवसुलीला बंदी आहे. तरीही दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांकडून वसुली सुरु आहे. शेतकऱ्यांसाठी अत्यंत तुटपुंज्या सवलती आहेत. तरीही महसूल वसुली, कर्जवसुलीचा तगादा लावला जात आहे. अशा संवेदना गमावलेल्या सरकारला शेतकऱ्यांनी जागा दाखवावी. नगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यात गाव पातळीवर तलाठ्याकडून करांची वसुली केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. याशिवाय अन्य दुष्काळी उपाययोजनांकडेही दुर्लक्ष केले जात असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. महसूलमंत्र्याच्या जिल्ह्यात महसूल कराची वसुली होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप आहे.



# लोककला महोत्सवाला रसिक-प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** महाराष्ट्र राज्याच्या गौरवशाली परंपरेचे आणि लोककलेचे जतन करण्यासाठी व लोककलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेत आयोजीत पारंपारिक लोककला महोत्सवाला रसिक प्रेक्षकांना उदंड प्रतिसाद दिला.

नांदेड जिल्हा परिषद व लोहा पंचायत समितीच्या वतीने श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेनिमित्त आयोजित पारंपारिक लोककला महोत्सवाचे उद्घाटन आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कामवार, चंद्रसेन पाटील, आनंदराव शिंदे, गट विकास अधिकारी आडेराघो आदींची उपस्थिती होती.



श्री खंडोबाच्या प्रतिमेचे पुजन करुन दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांचा काठी आणि घोंगडी देवून सत्कार करण्यात आला. शाहीर प्रेमकुमार मस्के यांच्या महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या माळेगाव यात्रेची वैभवशाली परंपरा आहे . यात्रेचे वैभव वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याने प्रतिसाद आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी केले .
**रमेश गीरी जीवनगौरवाने सन्मानित :** माळेगाव येथे पारंपरिक लोककला महोत्सवात नांदेड येथील शाहीर – हस्य सम्राट रमेश गीरी यांना आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार देवून गौरव करण्यात आला . यावेळी आमदार श्यामसुंदर शिंदे व पंचायत समितीचे सभापती आनंदराव शिंदे यांनी प्रत्येकी अकरा हजार रोख बक्षीस गीरी यांना दिले .

कारभारी दमानं... होऊ द्या दमानं, बाई मी लाडाची... कैरी पाडाची.. विविध लावण्या, खंडोबा गीत, वेस्टर्न, ग्रुप डान्स सादर केले. पांडुरंग मुळे नारायणगावकर तमाशा मंडळ मांजरवाडी या संचाने सादर केलेल्या चंद्रा व बाई मी लाडाची ग कैरी पाढाची या लावणी सादरणार रसिक थिरकले. यावेळी आनंद लोकनाट्य मंडळानी विविध लावण्यासह झुमकावाली पोरं ... वन्स मोर ठरले. अजंली राजे नाशिककर, रघुवीर खेडकर, हिराभाऊ बडे व शिवकन्या बडे नगरकर लोकनाट्य तमाम मंडळ नगरकर यांच्यासह विविध जिल्यातील कलाकारांनी लोककला मंचावर सादर केलेल्या. बहारदार गीतांने यावेळी रसिकांची मने जिंकली.

अनेक जिवंत लोककलेचे बहुरंगी दर्शन यानिमित्त राज्याच्या रसिक प्रेक्षकांना मिळाले. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील लाखो रसिक उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या वतीने स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. सुत्रसंचालन परशुराम कौशल्ये यांनी केले. सहाय्यक प्रशासन अधिकारी एस. डी. चोरमले, पी.एम. वाघमारे, विस्तार अधिकारी डी.आय. गायकवाड, धनंजय देशपांडे आदींनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.



# कस्तुरबा मुलींचे वसतिगृहातील विद्यार्थिनींची क्रिडा महोत्सवात उल्लेखनीय कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**नेर :** श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्था धुळे व जवाहर शिक्षण प्रसारक संस्था धुळे यांच्यतर्फे दि. ६ ते ७/१/२०२४ या कालावधीत स्वातंत्र्य सेनानी कै. आण्णासाहेब चुडामण पाटील क्रीडा महोत्सव २०२४ आयोजित करण्यात आला.या क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी धुळे ग्रामीणचे आमदार मा. कुणालजी रोहिदास पाटील व मा. सौ. अश्विनीताई कुणालजी पाटील हे उपस्थित होते. या महोत्सवात समता शिक्षण संस्था पुणे, संचालित कस्तुरबा वसतिगृह मोरणे (प्र.ल.) धुळे येथे निवासी असलेल्या व कै. श्री. तु. रा. पाटील माध्य. विद्यालय मोराणे येथे शिकणाऱ्या इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थिनींची उल्लेखनीय कामगिरी पुढीलप्रमाणे : १) ८०० मी. धावणे - द्वितीय *पारितोषिक (अमृता अशोक पाडवी - इ.८वी) २) ४०० मी . धावणे - प्रथम पारितोषिक* (कविता सदानंद कर्नर- इ.१०वी) ३) ४०० मी. धावणे - द्वितीय पारितोषिक (शारिका रायसिंग पावरा - इ.८वी) ४) २०० मी. धावणे - द्वितीय पारितोषिक (कल्पना विठोबा ठेलारी इ- ८वी) ५) १०० मी. धावणे - प्रथम पारितोषिक (कविता सदानंद कर्नर- इ.१० वी) ६) कबड्डी (मुली) - द्वितीय पारितोषिक विजेत्यांचा धुळे ग्रामीणचे आमदार मा. कुणालजी रोहिदास पाटील व उपस्थित इतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला. ह्या यशामुळे समता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. मा. उषाताई वाघ, सचिव मा. डॉ. जालिंदर अडसुळे, संस्थेचे सन्माननीय पदाधिकारी, कस्तुरबा वसतिगृहाचे पदाधिकारी व मा. मुख्याध्यापक आर. पी. पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी (भागाबाई आ. वाघ प्राथ. आश्रमशाळा मोराणे) यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पुजा धुमाळ ठरल्या पैठणीच्या मानकरी सालपे येथे खेळ पैठणीचा कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज



**लोणंद :** श्री.भैरवनाथ जन्माष्टमी,माँ साहेब जिजाऊ जयंती,ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले जयंती,राजेश्वर यशवंतराव होळकर राज्याभिषेक दिन,स्वामी विवेकानंद जयंती आणि मकरसंक्रातीच्या निमित्ताने सालपे ता.फलटण येथे महिलांसाठी खेळ पैठणीचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाला गावातील अबालवृद्ध,जेष्ठ महिला तरुणींनी मोठ्या संख्येने हजेरी लावून कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नगरसेविका दीपाली संदीप शेळके पाटील यांच्या हस्ते माँ साहेब जिजाऊंना व छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्प हार घालून दीपप्रज्वलाने करण्यात आली.यावेळी कलाकार प्रतिक कदम,
युवा नेते पंकज शिंदे, डॉ.अमित पवार,नवनाथ शिंदे,डॉ.विजय शिंदे,संदीप कुंडलकर,अभिलाष शिंदे,तुषार शिंदे,रामदास कोळपे, अक्षय शिंदे,अथर्व शिंदे,जितेंद्र पवार,प्रकाश शिंदे,सोहम शिंदे आदी उपस्थित होते.पुजा गणेश धुमाळ ह्या पैठणीच्या मानकरी ठरल्या.तसेच बऱ्याच महिला विजेत्या ठरल्या त्यांना ही आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या.मुलींच्या साठी खास खेळ घेण्यात आले. कार्यक्रमाचा आनंद सर्वानाच घेता आल्याने कार्यक्रम उत्कृष्टरित्या संपन्न झाला.खरं तर चुल आणि मूल या पलीकडे ही जग असते आणि आपला आनंद व्यक्त करता.यावा म्हणून खास महिलांच्या साठी त्यांना तणावमुक्त करण्यासाठी भैरवनाथ यात्रा कमिटी व राजमुद्रा ग्रुप सालपे यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



# १४ दिवस चालणार आवर्तन; ३९० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** अर्जुनसागर ( पुनंद) प्रकल्पातून सुळे डावा कालव्याला रब्बी आवर्तनचे पाणी सोडण्यात कळवणचे आमदार नितीन पवार यांना यश आले आहे. पाणी टंचाई जाणवणाऱ्या लाभक्षेत्रातील गावांना व शेतकरी बांधवाना दिलासा मिळाला असून ३९० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून १४ दिवस चालणाऱ्या कालव्याद्वारे पाणी पिळकोसपर्यंत पोहचणार आहे. रविवार(१४ जानेवारी) दुपारी २ वाजता कळवणचे नगराध्यक्ष कौतिक पगार यांच्या हस्ते कळवण बाजार समितीचे सभापती धनंजय पवार यांच्या व कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या उपस्थितीत अर्जुनसागर (पुंनंद ) प्रकल्पातून सुळे डाव्या कालव्याला पाणी सोडण्यात आले. पाणी टंचाईची झळ कळवण तालुक्यात कमी बसत असली तरी अर्जुनसागर (पुनंद)धरणातून सुळे डाव्या कालव्याला रब्बीचे आवर्तनचे पाणी सोडण्याची मागणी कालवा लाभक्षेत्रातील शेतकरी बांधवानी आमदार नितीन पवार यांच्याकडे केली होती. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार पाणी टंचाई लक्षात घेऊन आमदार पवार यांनी जिल्हाधिकारी व गोदावरी पाटबंधारे प्रकल्प विभागाच्या यंत्रणेकडे पाणी सोडण्याची मागणी केली होती. जिल्हाधिकारी यांनी याबाबतचा पाटबंधारे विभागाकडून अहवाल मागवून पाण्याची मागणी लक्षात घेवून रब्बी आवर्तनचे पाणी सोडण्याची सूचना पाटबंधारे विभागाला दिल्या होत्या

या आवर्तनाचा लाभ तालुक्यातील बोरपाडा, सावरपाडा, उंबऱ्याबन,चिंचपाडा, दह्याने,हुंड्यामोख,गणोरे,देसराने,धनेर, दरेभनगी,मोकभनगी, ककाणे,बिजोरे,विसापूर,धनगरपाडा, चाचेर,पिळकोस आदी लाभक्षेत्रातील गावांच्या शेतकऱ्यांना होणार आहे. यावेळी शरद गुंजाळ, ज्ञानेश्वर गुंजाळ,शांताराम आहेर, दादाजी जाधव, अशोक सूर्यवंशी, केदा सूर्यवंशी, कडू चव्हाण, वसंत जाधव, प्रकाश गुंजाळ, हिरामण गुंजाळ, निवृत्ती गुंजाळ, भाऊसाहेब गुंजाळ, काशिनाथ गुंजाळ, राहुल गुंजाळ, भिका पाटील, लक्ष्मण पाटील, नरेंद्र सावळे,बाळासाहेब जाधव, जिभाऊ बच्छाव, मनोज चव्हाण, गोकुळ वाघ, जयराम वाघ, बाळासाहेब वाघ, शशिकांत वाघ,रणधीर वाघ, अभिमन वाघ, अमित वाघ, प्रकाश वाघ आदी शेतकरी उपस्थित होते.

अर्जुनसागर ( पुनंद ) प्रकल्पातून सुळे डावा कालव्याला रब्बी आवर्तनचे पाणी सोडविण्यात आल्यामुळे कळवण तालुक्यातील शेतकऱ्यांना आणि जनतेला दिलासा मिळाला आहे . १४ दिवस सुळे डाव्या कालव्याला पाण्याचे आवर्तन चालणार असून पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे .
**आमदार नितीन पवार, कळवण**



# ग्रा.पं.पदाधिकाऱ्यांचा राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील वेरुळ पळसवाडी वेरुळ तांडा येथील ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी मा.आ.सतिष भाऊ चव्हाण यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित दादा पवार गट) पक्षात प्रवेश केला.खुलताबाद तालुक्यात सध्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सतिष भाऊ चव्हाण यांच्यावर विश्वास टाकत मोठ्या संख्येने विविध पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी सरपंच उपसरपंच चेअरमन व्हा चेअरमन सदस्य यांच्या (इनकमिंग) ची रांगा लागल्या असल्याचे चित्र आहे. तालुक्यात ठिकठिकाणी हे चित्र दिसून येत आहे. विजय राठोड,नाना ठाकरे, साहेबराव पांडव, चंदु राठोड, मसीयोदीन, कारभारी ढिवरे, मुलचंद चव्हाण, मदन राठोड, किशन चव्हाण, देवचंद चव्हाण, दगडु भेंडे, सोमीनाथ ठेंगडे आदींचे आमदार सतिष भाऊ चव्हाण यांनी पुष्पहार घालून सत्कार केला. यावेळी पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# माळेगावयात्रेत कुस्त्यांचा खेळ खंडोबा; पं.स.च्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करा

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेत यंदा कुस्त्यांच्या स्पर्धेचा खेळ खंडोबा झाला असल्यामुळे अनेक पैहलवान व हजारो प्रेक्षक यात्रेकरू यांच्यामध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून पं.स.च्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्याची करून बीडिओ आडेराघो व विस्तार अधिकारी देशपांडे सह सर्व अधिकारी कर्मचारी यांच्यावर जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी यात्रे कडून होत आहे. पं.स.च्या प्रशासकाराज मुळे यात्रेच्या नियोजनाचा फज्जा उडाला असून दि.10 रोजी पं.स.ची प्रशासक डी.के. आडेराघो यांच्या नेतृत्वात माळेगाव जि.प. शाळेच्या मैदानात मासिक सभा झाली या सभेला अनेक ग्रामसेवक अधिकारी यांनी पाठ फिरवली. तर दि.12 जानेवारी 2024 रोजी माळेगाव यात्रेत दरवर्षीप्रमाणे कुस्त्यांची स्पर्धा भरविण्यात आली सदरील स्पर्धेचे उद्घाटन आ. श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते 2 वाजता झाले व मानाची कुस्ती लावून आ. श्यामसुंदर शिंदे हे गेले त्यानंतर दोन-चार झाल्यानंतर या कुस्त्याच्या मैदानात मोठा गोंधळ उडाला अनेकांना बाय देत मॅनेज करून कुस्त्याने खेळत बक्षीस देण्यात आले. आणि कुस्त्या हे न लावता बक्षीसाची रक्कम हडप्प करण्यात आली असल्याचा आरोप यात्रे कडून केला आहे. कुस्त्याला 4 लाख 45 हजारांचे नियोजन करण्यात आले पण या कुस्त्या चा 2 लाखातच गुंडाळण्यात असल्याची चर्चा होत आहे. लोहा पं.स.च्या कर्मचाऱ्यांनी कुस्त्या न लावता कुस्त्यांच्या चिट्या या खिशात ठेवून रक्कम हडप्प केली असल्याचे रंगेहात आष्टूर चे माजी सरपंच तथा पेहलवान मधुकर बाबर यांनी पकडले व ते बीडिओ आडेराघो ला दाखवण्यात आली असल्याची माहिती मधुकर बाबर यांनी दिली व 2,3,4 हजारांच्या कुस्त्या गायब करून स्वतः पैसे पं.स. कर्मचाऱ्यांनी हडप केल्याचे आष्टूर चे माजी सरपंच यांनी हातात माईक घेऊन जाहीर रित्या सांगितले व कुस्त्या व्यवस्थित लावा माळेगाव यात्रेचे व नांदेड जिल्ह्याचे नाव खराब करू नका असे सांगितले. तसेच सायंकाळी अंधार होत असल्यामुळे अंधारात कंदोरी या म्हणी प्रमाणे अनेक कुस्त्या न खेळवीत काही पहिलवाना ना बॉय देता बक्षीस देण्यात आले. व यात काही खाजगी पंच एका आखाड्याचे आणून एका नामांकित पेपरच्या पत्रकाराचा भाऊ आहे म्हणून त्यांच्या मनावर कुस्त्या लावून तर बक्षिसांची खैरात मिलीभगत करून वाटप केल्याची चर्चा यात्रेकरुकडून होत आहे. तेव्हा या प्रकरणांची चौकशी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी यांनी करुन बीडीओ आडेराघो, विस्तार अधिकारी देशपांडेसह लोहा पं. स. च्या अधिकारी - कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी जनतेतून होत आहे.



**पोलिस निरीक्षक विलास गबाले यांची दबंगगिरी व पं .स .प्रशासनाचा अंदागोंदी कारभारामुळे कुस्तीकडे प्रेक्षकांनी फिरवली पाठ :** माळेगाव यात्रेतील अंतिम कुस्ती पहाण्यासाठी दरवर्षी मोठी गर्दी असते पण यंदा पं .स . चा अंदागोंदी व पोलीस निरीक्षक गबाले यांच्या दबंगगिरीमुळे माळेगाव यात्रेतील अंतिम कुस्ती पहाण्यासाठी प्रेक्षकांनी पाठ फिरवली दुपारी व कुस्ती मैदान कुस्ती पहाण्यासाठी प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती पण अंतिम कुस्ती पहाण्यासाठी अल्प प्रमाणात प्रेक्षक वर्ग होता .

# डॉ. रवींद्र आणि डॉ. स्मिता कोल्हे यांना 'पद्मगंधा'चा जीवनगौरव



आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पद्मगंधा प्रतिष्ठानचा नववर्षातला पहिला 'नलिनी बाळकृष्ण देवपुजारी' स्मृती जीवनगौरव पुरस्कार डॉ. रवींद्र कोल्हे व डॉ. स्मिता कोल्हे यांना जाहीर झाला आहे.डॉ.रवींद्र कोल्हे आणि डॉ.स्मिता कोल्हे हे मेळघाट या आदिवासी क्षेत्रातील बैरागड या दुर्गम गावातील आदिवासी लोकांना वैद्यकीय सेवा पुरवीत आहेत. त्यांच्या या सेवा कार्याची दखल घेत भारत सरकारच्यावतीने उभयतांना यापूर्वीच पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले आहे. येत्या २० जानेवारी २०२४ ला शनिवारी श्रीशक्तिपीठ रामनगर येथे संध्याकाळी पाच वाजता आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार कोल्हे दाम्पत्याला प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंकज चांदे, डॉ. गिरीश गांधी, डॉ.सतीश देवपुजारी, माधुरी साकुळकर उपस्थित राहणार आहेत. पद्मगंधा प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणाऱ्या जीवन गौरव पुरस्काराचे यंदाचे चोविसावे वर्ष आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मराठी व्यक्तींना हा पुरस्कार प्रदान केला जातो. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येतो. आता पर्यंत डॉ. रघुनाथ माशेलकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, ॲड.उज्वल निकम, जेष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर, क्रिकेटवीर सुनील गावस्कर, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, जेष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, पर्सिस्टंटचे सर्वेसर्वा मा. डॉ आनंद देशपांडे अशा अनेक मान्यवरांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

# करणी सेनेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी मनोजसिंह चौहान यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** करणी सेनेच्या नांदेड जिल्हा उपाध्यक्ष म्हणून भोकर येथील मनोजसिंह चौहान यांची निवड करण्यात आली आहे. #संभाजीनगर येथील प्रदेशाध्यक्ष देवीचंदसिंह बारवाल यांच्या हस्ते मनोजसिंह चौहान नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी मराठवाडा युवाध्यक्ष जगतसिंह राजपूत, नांदेड जिल्हाध्यक्ष शैलेंद्रसिंह ठाकुर, संभाजीनगर शहराध्यक्ष चरणसिंह राजपूत, शहर उपाध्यक्ष निलेश पवार,सिल्लोड शहराध्यक्ष नारायण राजपूत ,धम्मा कांबळे, सुरेश लंगडापुरे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.या निवडीबद्दल मनोजसिंह चौहान यांचे अनेकांनी अभिनंदन केले.



# निलय नाईक यांचा वेरूळ येथे सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वेरुळ येथे दर्शनासाठी माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे नातु आले असते त्यांचे बंजारा समाजाकडून पुष्पहार शॉल देवून सत्कार करण्यात आले. यावेळी नाईक भावुक झाले. माजी मुख्यमंत्री श्री वसंतराव नाईक यांचे नातु आमदार श्री निलय नाईक हे वेरूळ येथे दर्शनाला आले असताना त्यांचे स्वागत श्री मदन राठोड, चेअरमन श्री मुलचंद चव्हाण, श्री डिगंबर राठोड, श्री देवा चव्हाण, श्री राहुल राठोड, श्री अविनाश चव्हाण,श्री रवी चव्हाण, श्री जिवन चव्हाण यांनी केले.



# श्रीराम प्राणप्रतिष्ठा व स्वराज्याभिषेक दिनानिमित्त भोकरला विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** श्री राम मंदिर जिर्णोध्दार व श्री रामलल्ला मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या स्वराज्याभिषेक दिनानिमीत्त बुधवारी (ता.१७ ते रविवारी ता.२१) दरम्यान भव्य संगीतमय श्री रामकथा यज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शहरात होणाऱ्या भव्य संगीतमय श्री रामायण कथा यज्ञ सोहळा हा माऊलीधाम,नवा मोंढा येथे बुधवार (ता.१७) ते रविवार (ता.२१ ) पर्यंत होणार असून सकाळी ११:०० ते १२:०० वाजता पर्यंत हनुमान चालीसा व रामरक्षा मंत्र पारायण होणार आहे. तर संगीतमय श्री राम कथेची वेळ दुपारी १२:०० ते ४:०० वाजता पर्यंत राहणार आहे.ही कथा राष्ट्रीय कथाकार तथा सुप्रसिद्ध कीर्तनकार,रामायणाचार्य शिवाजी महाराज वटबे (आळंदी ), संगीत संयोजनात मुख्य गायक संतोष देवकर गुरुजी, आळंदी,सह गायक गणेश महाराज सावळे हिंगोली,तबला वादक चक्रधर शिंदे बीड,पॅडवादक



सुरज माने, झाकी गणेश महाराज परभणी, कीर्तिशःकुमार वैष्णव, मृदंगाचार्य, गणेश महाराज काकीलवाड व भजनी मंडळ भोकर हे सहभागी होणार आहेत.तसेच सोमवार (ता.२२) रोजी सकाळी ७:३० वाजता काल्याचे किर्तन होईल व सकाळी ८:३० वाजता शहरातील मुख्य मार्गावरून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. यात साधू,संत,महंत,महाराज,श्रीराम भक्त,छत्रपती शिवाजी महाराज प्रेमी,महिला,पुरुष हे सहभागी होणार आहेत. शोभायात्रेचा समारोप माऊलीधाम नवा मोंढा येथे करण्यात येणार आहे. ११:३० वाजता अयोध्या येथे होत असलेल्या श्री रामलल्ला मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना व श्री राम मंदिर जिर्णोध्दाराच्या सोहळ्याचे थेट प्रक्षेपण मोठ्या स्क्रिनवर पाहता येईल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांनी घरासमोर, सडा,सारवण, रांगोळ्यांनी सजवावे, घरावर भगवा ध्वज व गुढी उभारावी व फटाके, आतिशबाजिने सकाळी पाडवा साजरा करावा आणि सायंकाळी घर, मंदिर परिसर दीपोत्सवाने सजवून दिवाळी साजरी करावी. वाजंत्री वाजवून आनंदोत्सव साजरा करावा असे आवाहन आयोजक, श्री रामभक्त,भोकर विचार विकास मंच, समस्त गांवकरी मंडळी, लोकोत्सव समिती, समस्त हिंदू समाज, भोकर तालुका यांच्या वतीने करण्यात आले आहे.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# पत्रकार व त्यांच्या कुटुंबासाठी विशेष निधी उपलब्ध करू

## डॉ. ओमप्रकाश शेटे : व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** व्हॉईस ऑफ मीडिया ही पत्रकारांच्या हितासाठी झटणारी आंतरराष्ट्रीय पातळीवरील अग्रणी संघटना आहे. या संघटनेचे संस्थापक आणि राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे व महाराष्ट्राचे प्रदेश अध्यक्ष अनिल मस्के यांनी पत्रकार व त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांसाठी आपत्कालीन परिस्थितीत विशेष अर्थ सहाय्य मिळावे अशी मागणी केली होती.त्याअनुषंगाने पत्रकार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांसाठी विशेष निधी उपलब्ध करु..! अशी ग्वाही आयुष्मान भारत मिशनचे महाराष्ट्र प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी दिली आहे.ते नुकतेच वाशिम तेथे आले होते. त्यावेळी व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

व्हॉईस ऑफ मिडिया ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील संघटना आहे. या संघटनेचे संस्थापक संदीप काळे आणि प्रदेश अध्यक्ष अनिल म्हस्के यांनी पत्रकार व त्यांच्या कुटुंबातील सदस्य यांचे साठी आपत्कालीन परिस्थितीत विशेष अर्थ सहाय्य मिळावे अशी मागणी केली. या संदर्भात आम्ही गांभीर्याने विचार करत आहोत. नव्हे तर पत्रकारांसाठी विशेष बाब म्हणून त्यांच्या आरोग्य संदर्भात नक्कीच आमच्या कक्षाकडून भरघोस मदत मिळवून देऊ




अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. आयुष्मान योजनाआढावा बैठक संदर्भात १२ जानेवारी रोजी वाशिम येथे भेट दिली होती. याप्रसंगी व्हॉईस ऑफ मिडिया चे वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. केंद्र शासनाची आयुष्मान भारत-पंतप्रधान जन आरोग्य योजना व महाराष्ट्र शासनाच्या म. ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची एकत्रित अंमलबजावणी करणारे आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्राचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे हे वाशिम दौऱ्यावर आले होते. . मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष व केंद्रीय आरोग्य राज्यमंत्र्यांचे सहाय्यक खासगी सचिव म्हणून त्यांनी काम केले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रातून राज्यात डॉ. ओमप्रकाश शेटे यांना बोलवले आहे. डॉ. ओमप्रकाश यांनी केलेलं काम आणि मिळवलेल्या अनुभवाचा ते पुरेपूर वापर करत आहेत. यामुळे गरजू आणि सामान्य लोकांच्या अपेक्षा पूर्ण होताना स्पष्टपणे दिसत आहे. मूळचे उद्योजक असलेल्या डॉ. शेटे यांनी आजवर केलेल्या रुग्णसेवेच्या कामाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या कार्याचा लेखाजोखा बघून व्हॉईस ऑफ मिडिया चे जिल्हाध्यक्ष भागवत मापारी, जिल्हा महासचिव धनंजय कपाले, विदर्भ कार्याध्यक्ष विठ्ठल देशमुख, इलेक्ट्रॉनिक मीडिया विंग चे जिल्हाध्यक्ष किशोर गोमासे यांचेसह शहरातील मान्यवरांनी एका छोटेखानी कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला.

**मित्राचे आजारपण ठरला टर्निंग पॉइंट :** सुमारे १७-१८ वर्षांपूर्वी वर्गमित्राला रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले. त्याच्यावरील महागड्या उपचारांसाठी निधी गोळा करताना या मार्गातील अडचणींना तोंड द्यावे लागले, तोच आपल्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट ठरून रुग्णसेवेचे व्रत स्वीकारल्याचे शेटे यांनी यावेळी सांगितले. तेव्हापासून ग्रामीण भागांतील गरीब रुग्णांना मुंबईत चांगले उपचार मिळावेत यासाठी मदत देणे सुरू केले. आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने स्वखर्चातून स्वयंसेवकांचे सुद्धा जाळे उभारल्याचे त्यांनी सांगितले.

**धर्मादाय रुग्णालयांवर वचक :** सरकारकडून अल्पदरात जमीन, वीज, पाणी आणि कर सवलत मिळवणारी रुग्णालये 'धर्मादाय' प्रकारात मोडतात. या रुग्णालयांचे नियमित इन्स्पेक्शन करून त्यांना गरजूंसाठी राखीव खाटा आणि मोफत उपचार करण्यास भाग पाडले. बड्या रुग्णालयांनी या माध्यमातून आजवर सुमारे ९०० कोटी हून अधिक रुपयांचे उपचार केल्याचे शेटे यांनी सांगितले. रोज किमान ७०० रुग्ण मदतीसाठी मंत्रालयात येतात. त्या सर्वांना मदत मिळवून देण्याचा आपला प्रयत्न असतो.

# मैत्री कविकट्टा समूहाच्या वतीने दुसऱ्या साहित्य संमेलनाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मैत्री कविकट्टा समूहाच्या वतीने दुसऱ्या साहित्य संमेलनाचे आयोजन दि.२८, जानेवारी रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह, उर्वेला कॉलनी छत्रपती चौक नागपूर येथे १० ते ४ वाजेपर्यंत केले आहे. या संमेलनाचे आयोजन कवयित्री , लेखिका अलका अनिल साखरे यांनी केले आहे. पुरस्कार वितरण, सत्कार समारंभ व पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे सोबतच दुसऱ्या सत्रात निमंत्रित कवी,कवयित्रींच्या कवितांचे सादरीकरण होणार आहे. या संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक अशोक कांबळे नागपूर तसेच उद्घाटक, स्वागताध्यक्ष कैलास राखडूजी धोंडणे वनपरिक्षेत्र अधिकारी ब्रम्हपुरी, कुरखेडा येतील नगरसेविका सौ.प्राची कैलास धोंडणे राहतील दुसऱ्या सत्रातील कविसंमेलनाचे अध्यक्ष वैभव धर्माधिकारी पुणे ,व्याख्याते,तथा सदस्य साहित्य विचारपीठ मुंबई प्रमुख पाहुणे धनजंय गव्हाले संभाजीनगर, प्रसिध्द कवि सुरेश कायदे, पदविधर शिक्षक,अनिल साखरे संभाजीनगर, शोभा वेले प्रसिद्ध कवयित्री, सामाजिक कार्यकर्त्यां विशेष अतिथी प्रसिद्ध कवि,लेखक अस्तीन चौरे नागपूर, तसेच प्रितगंध व प्रातिनिधिक कवितासंग्रहाचे भाष्यकार कवि,लेखक संतोष मेश्राम ब्रह्मपुरी व अलका साखरे यांच्या प्रभातपुष्प सुविचार संग्रहाचे दुसरे भाष्यकार म्हणून कुरखेडा येतील साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्यां संगिता संतोष ठलाल हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत तरी या संमेलनात सहभागी होण्यासाठी बहुसंख्येने कवि,कवयित्री उपस्थित रहावे, असे आवाहन कवयित्री अलका, अनिल साखरे यांनी केले आहे.

# छत्रपती चषक स्पर्धेत बी.बी.सी. शेवडी संघाने पटाविले प्रथम बक्षीस

## क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना थरारक: 28 वर्षांपासून सामन्याची परंपरा कायम

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :**खडकी सदार येथे सुरू असलेल्या क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना रविवार दिनांक 14 जानेवारी रोजी खेळण्यात आला. यामध्ये बीबीसी शेवडी या संघाने हा सामना जिंकून छत्रपती चषक खडकी सदार 2028 याच्यावर आपले नाव कोरले तर दुसरे पारितोषिक जय किसान भर या संघाने पटकावले तर तिसरे पारितोषिक संकट मोचन बिबखेडा या संघाने तर चौथे पारितोषिक अलमोमीन रिसोड या संघाने पटकावले. विजयी संघांना रिसोड मालेगाव मतदार संघाचे आमदार अमित झनक यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी क्रार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार अमित झनक संजय शिंदे सभापती (कृ उ बा) रिसोड, राजाराम अरुण उपसभापती (कृ उ बा) रिसोड, प्राध्यापक पंढरीनाथ चोपडे, रामेश्वर देवकर, अध्यक्ष काँग्रेस तालुका कमिटी विकास झुगरे शहराध्यक्ष भूमिपुत्र शेतकरी संघटना,, बबन सानप संचालक कृ.उ. बाजार समिती रिसोड, रवि चोपडे (कु.उ.बा), राम देशमुख, विवेक भुतेकर, शिद्धू अण्णा कोठुळे, गोरख भुतेकर, घनश्याम मापारी, भगवानराव चोपडे, राजूभाऊ खाबलकर उपध्यक्ष युव कॉंग्रेस, सतीश गाडे, पुरुषोत्तम रंजवे, कैलास लांडगे, लक्ष्मण हागे संरपच वाडी रायताळ, रियाज भाई, गजानन गव्हाणे, मंगेश ढोणे, गजानन मापारी, राजू कोकाटे, साजिद भाई, प्रकाश चोपडे, बळीराम चोपडे, गजानन खडसे, आप्पाजी शिंदे (म पो), प्रमोद गरकळ, गोपाल मोरे, , सुनील भुतेकर, उत्तमराव झगडे' लोडूजी सदार मा. सरपंच, प्रदिप सदार प्रकाश धांडे (पो. पा) आत्माराम सदार, गजानन सदार, संदिप सदार, कैलास सदार, आदी मंडळी उपस्थीत होते. सामना सुरु असताना आमदार अमित झनक याना संमालोचन करण्याचा मोह आवरला नाही. त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे समालोचन करुन खेळाडूला प्रोसाहन दिले. तसेच छत्रपती चषक २८ वर्षापासून अविरत चालू असणारे पहिले चषक असून, या स्पर्धेमध्ये अंतिम सामना झाल्या नंतर सर्व खेळाडू व प्रेक्षक यांना स्नेहभोजन देणारे महाराष्ट्रील एकमेव स्पर्धा आहे, असे यावेळी ते म्हणाले. या स्पर्धेत ऐकुण 36 संघाना प्रवेश देण्यात आला होता. या 36 संघामध्ये बिबीसी शेवडी या संघाने अतिशय चांगल्या प्रकारे खेळ दाखवत फायनल पर्यंत मजल मारली आणि 2028 छत्रपती चषक आपल्या नावार नोंदवला.




**आमदार अमित झनक यांनी केला आयोजन कमिटीच्या वडिलाचा सन्मान :** स्पर्धा पार पाडण्यासाठी आयोजन कमिटीला स्पर्धा सुरु होण्या आधीपासून पंधरा दिवस सतत मैदानावर काम करावे लागत आसत. आपल्या कामातून वेळ काढून देत असतात. मात्र यासाठी त्यांच्या आई वडीलाकडून सुद्धा मुलांना प्रोत्साहन देण्यात येत असते. त्यांच्या मागील काम त्यांचे वडिल पंधरा दिवस बघत असतात. त्यामुळे त्यांच्या वडिला सुद्धा येथे सत्मान करण्यात यावा असे आमदार अमित झनक यावेळी त्यांनी सुचवले.

स्पर्धा पार पाडण्यासाठी संजू भाऊ सदार मित्र परिवार व यंग बॉईज क्रिकेट संघ खडकीसदार यांनी गेल्या मागील 28 वर्षापासून अविरत असे प्रयत्न आणि परिश्रम घेत असतात चार जिल्ह्यांमध्ये नावलौकिक असणारी स्पर्धा येणाऱ्या 29 व्या वर्षात पदार्पण करणार आहे. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरिभाऊ बाजड यांनी केले.

# जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** जिल्हा परिषद शाळा व्याड येथे या वर्षी प्रथमच विद्यार्थ्यांचा बाल आनंद मेळावा साजरा करण्यात आला आहे. या मेळाव्याचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष विनोद बोरकर यांनी फित कापून केले. तसेच यावेळी शाळा स्थापन समितीचे सर्व सदस्य तथा ग्रामपंचायतचे सदस्य सुद्धा उपस्थित होते. रामजी बोरकर व मनोज थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती.

बाल आनंद मेळाव्यामध्ये इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे स्टॉल लावले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संतोष बिल्लारी सर यांनी या उपक्रमा विषयी माहिती देताना सांगितले की, बाल आनंद मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांनी लावलेल्या स्टॉल मागचा उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांच्या गणित विषयांमध्ये असलेल्या नफा व तोटा या घटकाचे प्रात्यक्षिक या उपक्रमांमधून केले जाते. व्यवहारांमध्ये होणारा नफा किंवा तोटा याविषयीची माहिती प्रत्यक्षपणे मुलांना येत असते त्यामुळे अशा प्रकारचा बाल आनंद मेळावा भरवण्यात येतो. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बिल्लारी सर यांनी केले तर मुख्याध्यापक .अरुण झुंगरे सर यांनी मार्गदर्शन केले. आरु सर, बोरकर सर,सौ. डाखुरे मॅडम व सौ.जाधव मॅडम यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अनिल गुंजाळ सर यांनी केले.



# जळगावात आदिवासी कोळी समाजाचे झोपा काढो आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** जातीचे दाखले नोंदींवरून सरसकट मिळावेत, रक्ताच्या नात्यातील व्यक्तींना कोणतेही कागदपत्र न मागता जातवैधता प्रमाणपत्र मिळावे यांसह अन्य मागण्यांची शासन-प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे आदिवासी कोळी समाजबांधवांनी पुन्हा अन्नत्याग आंदोलन सुरू केले असून, शनिवारी संतप्त समाजबांधवांनी जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर झोपा काढो आंदोलन केले. प्रलंबित मागण्यांसाठी गतवर्षी १० ऑक्टोबरपासून २६ दिवस आदिवासी कोळी समाजबांधवांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अन्नत्याग सत्याग्रह आंदोलन केले होते. त्यावेळी शासन-प्रशासनाने दोन महिन्यांत सर्व मागण्यांची पूर्तता करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, मागण्यांची पूर्तता न झाल्यामुळे चार जानेवारीपासून आदिवासी कोळी आंदोलन समन्वय समितीतर्फे अन्नत्याग आंदोलन सुरु करण्यात आले आहे. आंदोलनास १३ जानेवारी रोजी १० दिवस होऊनही शासन- प्रशासनाकडून दखल न घेतल्यामुळे आदिवासी कोळी समाज आंदोलन समन्वय समितीतर्फे प्रा. भाऊसाहेब सोनवणे यांच्या नेतृत्वात संतप्त समाजबांधवांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशाद्वारावरच झोपा काढो आंदोलन केले. आंदोलनात प्रल्हाद सोनवणे, बबलू सपकाळे, विठ्ठल तायडे, सचिन सैंदाणे, सतीश कोळी, राजू सोनवणे, दीपक सोनवणे, रवींद्र सोनवणे, आशा कोळी, वत्सला सपकाळे, धनश्री कोळी, चंद्रभागा कोळी, मीरा कोळी, लता कोळी आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी होते.

# सौ. प्रतिमा काळे बंधुता काव्यप्रतिभा पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** राजमाता जिजाऊ जयंती व राष्ट्रीय युवकदिन या विशेष दिवसाचे औचित्य साधून,समाजातील वास्तव सांगुन खरी समानता,एकता, बंधुता मना मनात पेरण्याचे काम मागील पंचवीस वर्षापासुन राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलन करत आहे.या आदर्शवादी संमेलनात समाजातील प्रामाणिक सर्वच क्षेत्रात योग्य कार्य करणाऱ्या व्यक्तींचाच सन्मान करण्यात येतो.

अनेक नवोदित कवी, लेखक,साहित्यिक,विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती या बंधुता परिवाराने सन्मानित केल्या आहेत.अशा अत्यंत महान कार्य करणाऱ्या संस्थेकडून निगडी प्राधिकरण पुणे,४४ येथील शिक्षिका, लेखिका, कवयित्री, समीक्षक, परीक्षक, निवेदिका, मार्गदर्शिका, समाजसेविका म्हणून प्रेरणादायी कार्य करणाऱ्या सौ.प्रतिमा अरुण काळे यांना अत्यंत प्रतिष्ठेचा "बंधुता काव्य प्रतिभा" साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.पुरस्कार मिळाल्यानंतर महाराष्ट्रातील प्रत्येक साहित्यिकांचे मत होते अतीशय योग्य व्यक्तींना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

अध्यापणासोबत, सामाजिक, शैक्षणिक, वैचारिक कार्यात सलग २१ वर्षापासून अखंडितपणे निस्वार्थीपणे,प्रामाणिकपणे काम करत आहेत,राष्ट्रीय बंधुता परीवाराचे पुणे येथे राष्ट्रीय संमेलनांचे उद्घाटन सोहळा प्रसन्न वातावरणात संपन्न झाला यावेळी प्रथम सत्रात, श्री कृष्ण कुमार गोयल (प्रसिद्ध उद्योगपती) संतसींग मोखा, अध्यक्ष, श्रीमती माधुरी ओव्हाळ, स्वागताध्यक्ष, चंद्रकांत दादा वानखेडे (प्रा. जेष्ठ साहित्यिक), डॉ. विजय ताम्हाणे (नेत्र तज्ञ) ,प्रा. प्रदिप पाटील ( शिव व्याख्याते) उत्कृष्ट सुत्रसंचलन श्रीमती संगीता झिंजुरगे, श्री शंकर आथरे, श्री गुलाबराजा फुलमाळी या मान्यवरांच्या उपस्थितीत बंधुताचार्य प्रकाश रोकडे व प्रसिद्ध उद्योगपती श्री कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते सौ.प्रतिमा अरुण काळे यांना "बंधुता काव्यप्रतिभा" साहित्य पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. त्यांनतर शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्षेत्र, नातेवाईक मित्रमंडळी यांच्याकडुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# सततच्या बातम्यांनंतर कठड्याला रंगरंगोटी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी व सुलतानपूर मंडळ मधे गत दोन वर्षात झालेल्या पुलकामां नंतर कठड्याची रंगरंगोटी न करता बीले काढण्याचा धडाका सुरु असुण याकडे ना शाखाभियंता उपाभियंता ना कार्यकारी अभियंता यांचे लक्ष नसुन पुलकठडे रंगरंगोटी विनाच बीले निघतातच कसे व काम पुर्ण झाल्याचे पाहणी कोण करत आहवाल कोण देतं याची चौकशी वरिष्ठांनी करून रंगरंगोटी न झालेल्या पुल कठड्याची बील थांबवावी व रंगरंगोटी झाल्यावरच बील अदा करावी असी मागणी नागरिकांतून होत आहे. तालुक्यातील सततच्या बातम्या नंतर गिरीजा नदी वरील पुल, गोळगाव नाल्यावरील पुल, बाजार सावंगी येथील दवाखाना कॉलनी, बाजारपेठ,इंदापूर फाटा व नुकतेच बोडखा झरी रस्त्यांवरील पुल आदि पुलांच्या कठाड्यांची रंगरंगोटी ठेकेदार कडून करण्यात आली आहे.मात्र इंदापूर बोडखा रस्त्यांवरील पुल, सावंगी जैतखेडा रस्ता झरी नाला, वडगाव येथील दोन नाले, त्यापुढे तालुका हद्दीवरील दोन पुले, धामणगाव येथील पुल, धामणगाव तांडा येथील पुल, अब्दुल पुरा शेतवस्ती लगतचा पुल, टाकळी राजेराय डोगरालगत नाल्यावरचं पुल,काटशेवरी -गोळेगाव फाटा जटवाडा रस्ता रसुलपुरा पर्यंतचे दोन तीन पुल आदि ही सर्व पुलांचे कामे गतवर्षात पुर्ण झाली मात्र कामे पुर्ण झालेल्या पुलांच्या कठाड्याना ठेकेदाराकडून रंगरंगोटी करण्यात आली नाही.पुलाचे टेंडर घेताना कठडयाची रंगरंगोटी कामांच्या माहितीचे फलक हे सर्व यात समाविष्ट असते मात्र याकडे कुणाचेच लक्ष नसतं व याची संधी ठेकेदार घेत आहे. रंगरंगोटी फलक पुलदरम्यान सपाटीकरण आदिना ५०-६० हजार रुपये खर्च अपेक्षित आहे व ते न करता व याकडे शाखा अभियंता उप अभियंता कार्यकारी अभियंता यांचे दुर्लक्ष का? म्हणून व ही सुट का? बरं शासन व जनतेच्या सवलत सुविधाच्या निधी पैशाचं दुरापोयोग का? म्हणून. भर अब्दुला गुड थैली मे या प्रवतीला लगाम लावावा. याकडे शासन व वरिष्ठ प्रशासनातील अधिकारी केव्हा याकडे लक्ष देणार यासंदर्भात सतत बातम्या द्वारे विभाग व वरिष्ठांना अवगत करुनही कारवाई का होत नाही.याचा काय गौडबंगाल आहे हे नागरिकांना कळेना तालुक्याभर हे प्रकार उघड उघड सुरु आहे. याची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून हा प्रकार थांबवावा व अंदाज पत्रकांनुसार कामे करुन घ्यावे जे णे करुन शासन जनतेच्या निधीचा सद उपयोग होईल असी मागणी नागरिकांतून होत आहे.

# पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहार ज्ञान महत्त्वाचे : बरसमवाड

आधुनिक केसरी न्यूज

**पाथर्डी :** येळी येथील महात्मा गांधी विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधत 'फूड फेस्टिवल' अर्थातच 'बाल आनंद मेळावा शनिवार दि. १३ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला होता. पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहार ज्ञान महत्त्वाचे असते,प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक विठ्ठल बरसमवाड यांनी केले या मेळाव्याचे उद्घाटन माजी सरपंच संजय बडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून येळेश्वर संस्थानचे महंत ह. भ. प.श्री. रामगिरी महाराज व सरपंच आबासाहेब जगताप उपस्थित होते. .विद्यार्थ्यांनीआपापल्या शेतातील भाजीपाला, फळे तसेच घरीच तयार करून आणलेले विविध खाद्य पदार्थ विकण्यास आणले होते. आपण आणलेल्या भाजीपाल्याचे व खाद्य पदार्थांचे महत्त्व आणि मूल्य सांगत मुलांनी पालकांनाही खरेदी करण्यास भाग पाडले.विद्यार्थ्यांनी व्यवहारचातुर्याच्या जोरावर उपस्थित मान्यवरांची व पालकांची मने जिंकून घेतली.

बाजारातील देवघेव, हिशोब - करणे, वस्तूंची किंमत ठरविणे, वस्तू बद्दल माहिती पटवून सांगणे याबाबत लहान वयातच मुलांना माहिती व्हावी यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे विद्यालयाचे मुख्याध्यापक अंकुश अवघडे सर यांनी सांगितले.

शाळेने राबवलेला हा उपक्रम अतिशय सुंदर स्तुत्य आहे. मुलांच्या जडणघडणीत अशा उपक्रमाचा महत्त्वाचा वाटा असतो असे सांगत संजय बडे सर यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्या बरोबर, उत्तम आरोग्य आणि आहाराबाबत मार्गदर्शन केले. या मेळाव्यात ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी आणलेला सर्व भाजीपाला, फळे व खाद्य पदार्थ या वेळी विकले गेले.

यावेळी सरपंच आबासाहेब जगताप , प्रा. शा.च मुख्या अनिल कराड, पालक व ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी ज्येष्ठ शिक्षक श्री.महेशकुमार शिरसाट, अर्जुन गायकवाड, आदिनाथ शिदोरे, शेख सिंकदर , श्रीम.शिला शिंदे, प्रियंका आठरे , व जयराम म्हस्के मामा यांनी परिश्रम घेतले. या बाल आनंद मेळाव्याची चर्चा पंचक्रोशीमध्ये कौतुकाने होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्जुन गायकवाड तर आदिनाथ शिदोरे यांनी आभार मानले.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर